# भक्त मंडळाचे सभासद

सप्टेंबर – ऑक्टोबर – नोव्हेम्बर १९५७ मध्यें झालेल्या सभासदांचीं नांवें पुढीलप्रमाणें—

## आजीव सभासद

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. भीमण्णा भूपाळ | रायचूर |
| २ | ,, कृ. ना. मयेकर | मुंबई १२ |
| ३ | डॉ. द. कृ. नेरुरकर | मुंबई २८ |
| ४ | श्री. व. भि. पाठारे | मुंबई २ |
| ५ | ,, ज. म. वाडिया | मुंबई ४ |
| ६ | ,, न. क. बडोदावाला | मुंबई २६ |
| ७ | श्रीमती जनाबाई दळवी | मुंबई १२ |
| ८ | श्री. रा. फु. देसाई | मेहसाणा |
| ९ | डॉ. र. जी. देसाई | नवसारी |
| १० | चि. गो. तु. गोंदकर, पाटील | शिरडी ( अज्ञान ) |
| ११ | चि. सुरेश द. जोशी | जालना ( अज्ञान ) |
| १२ | श्री. मु. न. पांडे | मुंबई ४० |
| १३ | ,, ना. भा. पाटील | दोंडाईचे |
| १४ | ,, भ. बा. शेट्टी | पुणें २ |
| १५ | ,, वि. म. सोळंकी | मुंबई १३ |
| १६ | श्रीमती माई शिरोडकर | मुंबई ४ |
| १७ | श्री. म. आ. नारायणराव | पुणें २ |
| १८ | ,, मो. बिहारी | हैद्राबाद |
| १९ | ,, फि. एम्. हिराणी | कराची ५ |
| २० | ,, नू. एम्. हिराणी | कराची ५ |
| २१ | ,, वि. व. सुळे | कंपाला |

## जानेवारी ते नोव्हेम्बर १९५७

| | | |
|---|---|---|
| साधारण सभासद | मुंबई प्रांत | ६६१ |
| ,, ,, | इतर प्रांत | १२४ |
| आश्रयदाते | मुंबई प्रांत | ३ |
| ,, ,, | इतर प्रांत | ० |
| आजीव सभासद | मुंबई प्रांत | ७१ |
| ,, ,, | इतर प्रांत | २४ |
| | एकूण सभासद | ८८३ |

# श्रीसाई संस्थानला मिळालेल्या देणग्या

सप्टेम्बर ते नव्हेम्बर १९५७ या अवधींत शिरडी व मुंबई येथें श्रीसाई संस्थानला पुढील प्रमाणें देणग्या मिळाल्या आहेत. पन्नास व पन्नास रुपयांहून अधिक असलेल्या रकमांची यादी पुढें दिलेली आहे.

## इस्पितळ देणगी

| | | |
|---|---|---|
| श्री. आर. एम्. वकील | मुंबई ६ | रु. ५१—०० |
| ,, दामोदर दास हिरजी | पोरबंदर | ,, १००—०० |
| ,, जी. एफ्. देसाई | नडियाद | ,, ५०—०० |
| ,, बी. के. पंड्या | मुंबई ३ | ,, ५१—०० |
| ,, मे. र. पटेल | मुंबई ४२ | ,, १७७—७५ |
| ,, ए. सी. एम. नंबियार | दिल्ली | ,, २०१—०० |
| ,, सॉलोमन यांज कडून श्री. तु. मु. सावर्डेकर स्मरणार्थ | मुंबई नं. २८ | ,, १०१—०० |
| ,, बळवंत जी. शाह | मुंबई २३ | ,, ५०—०० |
| मे. नूर अल्ली आणि कंपनी | कराची | ,, ३००—०० |
| श्रीमती पद्मा मडगांवकर | मुंबई | ,, १००—०० |
| श्री. एस्. आर. गोरुर | बेल्लारी | ,, १५०—०० |
| ,, के. वैद्यनाथन | सिकंदराबाद | ,, १००—०० |
| ,, मधुकर एम्. कामत | मुंबई | ,, १०८—७५ |
| ,, एस्. आर. रामशास्त्री अभ्यंगर | बंगलोर | ,, ७०—०० |
| श्रीमती एम्. ए. दार | मुंबई १४ | ,, ५०—०० |

## कायम-फंड देणगी

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. मं. अ. नारायणराव | पुणें २ | रु. | ५०—०० |
| ,, एम्. मोल्ली रेड्डी | अनंतापूर | ,, | ३००—०० |
| ,, दौलत रॉय आर. वासलू | असनसॉल (बंगाल) | ,, | १५०—०० |

## इमारत-फंड देणगी

| | | | |
|---|---|---|---|
| मे. गोल्ड सोप फॅक्टरी | मुंबई ८ | ,, | १०७—०० |
| श्री. व्ही. आर. सिरव्हनतीस | मुंबई ४ | ,, | ५०—०० |
| डॉ. व मिसेस छो. जी. पटेल | कंपाला | ,, | १५१—०० |

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. बी. गोपाळ रेड्डी, डुर्की | निझामाबाद | ,, | १४५—५० |
| ,, जी. एम्. सी. राव | मुंबई | ,, | ६८—०० |
| मे. एस्. एन्. खत्री ॲन्ड कंपनी | बारामती | ,, | ५६०—०० |
| श्री. भिमाजी अर्जुन मिस्त्री | नाशिक | ,, | १०१—०० |
| ,, बन्सीलाल देवकरण मिस्त्री | नाशिक | ,, | १०१—०० |
| ,, के. यादगिरी | सिकंदराबाद | ,, | १००—०० |
| ,, डी. डी. यादव | अस्ती | ,, | १०१—०० |
| ,, पी. नागेश्वरराव | सिकंदराबाद | ,, | ७३—७५ |
| ,, उस्मान अली महंमद | मुंबई | ,, | ५१—०० |
| ,, जे. एम्. याशिक | मुंबई | ,, | ५१—०० |

## उत्सव-फंड देणगी

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. राजाराम मयेकर | कंबोदिया | ,, | १००१—०० |

## चुकीची दुरुस्ती

(१) मार्च १९५६ अंक (१ ला) पान ४८ श्री. आ. ग. भाइंदरकर, सरकारी रोखे, रु. ३००/–चे वरील व्याजाचा उपयोग शिक्षणावर या बदली धर्मार्थ दवाखाना यासाठीं करावा अशी इच्छा प्रदर्शित केली आहे.

(२) ऑक्टोबर १९५७ अंक (३ रा) पान ७२ चे पुढील–पान १ ली ओळ मे, जून, जुलै व ऑगस्ट असें वाचावें.

शेवटची ओळ साधारण सभासद मुंबई ३५० व इतर प्रांत ९५ हे जानेवारी ते ऑगस्ट १९५७ पर्यंत.

संयुक्त चिटणीस
**डी. बी. राणे**
**सी. बी. वेलकर**




## सप्टेंबर १९५७

या महिन्यांत साई दर्शनासाठीं बाहेर गांवचे भक्त नेहमींप्रमाणें आले होते, कांहीं कलावंतांनीं श्री पुढें हजेरी दिली त्यांची नांवें:—

**कीर्तन:**—ह. म. प. श्रीपादबुवा काणे, गणेश वाडीकर, ह. भ. प. पोपट बुवा लोहणेकर, ता. सटाणा, सं. गवई, मराठे यांचीं दोन कीर्तनें भा. शु. ११ व भा. व. ११ अशीं झालीं.

**काव्य गायन:**—श्री अभिमन्यू धर्माजी गोसावी, मुंबई, श्री. विठ्ठल गंगाराम उमाप, मुंबई.

**गायन:**—श्री. नरोडे कोपरगांव (भजन) श्री. डॉ. स. बा. भट पुणें. (गायन) श्री. मनोहर कामत, मुंबई (गायन) श्री. केशरबाई बांदोडकर, मुंबई (गायन) श्री. मधुबाला केळवेकर, मुंबई (गायन) राज हंस डान्सिंग पार्टी, पुणें, श्री. कृष्णराव नार्वेकर यांनीं मोठ्या उत्साहानें भाग घेतला होता. श्री. मारुती जळोजी, श्री. नागोबा जळोजी मराठवाडा (गायन) श्री. डाणेदार, राहता, (गायन) श्री. पांडुरंग भीमराव चिकेसर, नगर (तबला)

**जादू प्रयोग:**—श्री. विनायक रामचंद्र लेके मुं. बेळवेडी (नगर) नूतन युवक वैश्य मेळा, भिवंडी, या मेळ्यातील मुलांमुलींचा कार्यक्रम नृत्य, गायन, वादन, संवाद, वगैरे.

**नाट्य प्रयोग:**—साईनाट्यसंघ, रत्नागिरी, श्री संत कवी ह. भ. प. दासगणू महाराज शिर्डीस श्रीचे दर्शनास आले होते.

श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीचे व्यवस्थापक अधिकारी श्री. बी. आर. देखणे यांची बदली होऊन त्यांचे जागीं श्री. चिकटे साहेब हे आपले कामावर रुजू झाले आहेत. संस्थान धर्मार्थ दवाखान्याचा नेहमीप्रमाणें रुग्णाना फायदा होत आहे.

## आक्टोबर १९५७

चालू महिन्यात शिर्डीस श्रीचे दर्शनाकरितां बाहेरगांवचें भक्तांची फार दाटी झाली. शिवाय पुण्यतिथि महोत्सवानिमित्त हजारों लोक आले होते, या महिन्यात झालेले कार्यक्रम:—

**कीर्तन:**—श्रीसाईभक्त के. बी. डॉ. गव्हाणकर श्री बा. ऊर्फ बाबुराव देव सं. गवई मराठे यांचीं ३ कीर्तनें या महिन्यांत झालीं.

**गायन:**—श्री. कृष्णराव वऱ्हाडकर, मुंबई, श्री. गजानन श्रीधर पंडित, दादर मुंबई. श्री. यशवंतराव पवार, परेळ. श्री. भाले, परळ. श्री. ठाणेदार, राहता. श्री.

अशोक येवला. श्री. कमलाकर व्यंकटेश काटे, कळंब. श्री. संगीतराव केशरीनाथ बुवा भाये, वरळी, श्री. अर्जुनराव मांडवीकर, वरळी. श्री. नामदेव जगताप पुणतांबे, (तबला). श्री. मुरलीधर का. सोनवणे–नाशिक, (सनईवादन). श्री. हिरामन गंगाराम कोळेकर, भुसावळ (हार्मोनियम). श्री. नरहरबुवा व्यास, कोपरगांवे. श्री. चंद्रकांत लक्ष्मण गोसावी, मुंबई. (तबला व गायन) श्री. पुष्पलता कुळकर्णी, चेंबूर (गायन).

दिवाळींत श्री लक्ष्मीपूजन, श्रीसरस्वती पूजन श्री. हरिभाऊ शेळके शिर्डी यांचे हस्तें मोठ्या थाटात झालें. दीपोत्सव, श्रींचे समाधीस पहांटे मंगल स्नान शोभेची दारू, फटाकडे वगैरे उत्सव झाला. सर्व संस्थानचे नोकर सेवेकरी यांना फराळ देण्यात आला.

कोजागिरी पौर्णिमेनिमित्त श्रींचे मंदिरांत रात्रौ श्री. पां. का. चिकटे साहेब, व्यवस्थापक अधिकारी (श्रीसाईबाबा व संस्थान शिर्डी) यांचे हस्तें श्रींची महापूजा, तुळशी अर्पण चंद्रपूजा, सर्व भक्तांना कॉफीपान व श्री. डॉ. के. बी. गव्हाणकर यांचे कीर्तन व इतर भक्तांसह रात्रौ जागरांत भाग घेणारे कलावंत श्री. डॉ. गव्हाणकर श्री. विनायक तोंडवळकर, श्री. गोपिनाथ नवगर मुंबई, श्री. ल. ना. चव्हाण, श्री. कांबळे, श्री. पुंडलीक पिंगळे श्री. अनंतराव खराडे, श्री. बा. धी. हरळमळकर मुंबई, शिर्डीसंस्थान धर्मार्थ दवाखाना नेहमीप्रमाणें चालू आहे.

## तूं माझी माऊली

तूं माझी माउली ।
कृपेची साऊली ।
प्रेमामृत पाजीं ।
सद्गुरु माये ॥

तूं माझा वडिल ।
मी तुझा धाकुला
सोडवी गा मला ।
भवपाशांतूनी ॥

तूं माझा सोयरा ।
विसांवा संसारीं
नावाडी तूं माझा ।
या भवसागरीं ॥

गोविंद म्हणे श्रीसाई ।
संसारीं दुःख फार ।
सोडवी गा मज ।
सद्गुरु राया ॥

—गो. म. राणे

## पुण्यतिथि उत्सव

श्रीसच्चिदानंद सद्गुरु श्रीसाई महाराज मु. शिर्डी. ता. कोपरगांव. जि. अ. नगर यांचा एकुणचाळिसावा पुण्यतिथि उत्सव शिर्डी येथें श्रीसाईबाबा संस्थांतर्फे करण्यांत आला.

उत्सवास प्रारंभ मिति आश्विन शु. ९ बुधवार दि. २।१०।५७ रोजीं झाला व मिति आश्विन शु. १२ शनिवार दि. ५।१०।५७ रोजी समाप्त झाला. उत्सवास

मुंबई, पुणें ठाणे, कल्याण वगैरे मुंबई प्रांतांतील व म्हैसूर प्रांतांतील व आंध्र प्रांतांतील बरेच साईभक्त आले होते, तसेंच जवळपासचे गांवांहून बरीच भक्त मंडळी आली होती.

## झालेले कार्यक्रम

बुधवार ता. २।१०।५७ रोजी नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त श्री. बा. ऊर्फ बाबुराव देव, यांचें दोन प्रहरीं ४ ते ६॥ पर्यंत श्रीमंदिरात कीर्तन, रात्रौ श्रीची पालखीची मिरवणूक, कलाकारांचे कार्यक्रम साडे-अकरा वाजेपर्यंत झाले. गुरुवार ता. ३।१०।५७ रोजी नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त गांवांतून भिक्षा मिरवणूक, श्रीसाईचरित्रावर श्री. बाबुराव देव यांचे कीर्तन श्रीचे जुन्या कापडांची प्रसाद म्हणून विक्री सायंकाळीं सिमोल्लंघन मिरवणूक मंत्रजागर, रात्रौ श्रीचे रथाची मिरवणूक रात्रभर कलाकाराचे कार्यक्रम, गायन, वादन, नृत्य, नकला, भावगीतें, भक्तिगीतें वगैरे रात्रभर जागर.

शुक्रवार ता. ४।१०।५७ रोजी सकाळी नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त (सामुदायिक अभिषेक पूजा अर्चन) भिक्षा मिरवणूक, श्रीचे कापडांची विक्री, दोनप्रहरीं श्री. मधुकर जोशी पुणें, यांचें कीर्तन. रात्रौ पालखीची मिरवणूक कलाकारांचे कार्यक्रम रात्रौ १२ वाजेपर्यंत.

शनिवार ता. ५।१०।५७ रोजी सकाळीं १० ते १२ पर्यंत सं. गवई विठ्ठलराव मराठे यांचे गोपालकाला कीर्तन. नंतर दहीं हंडी होऊन उत्सव समाप्त झाला.

उत्सवाचे व्यवस्थेकरितां संस्थान कमिटीची मंडळी अध्यक्ष, ऑ. सेक्रेटरी, ऑ. खजिदार, ट्रस्टी, मॅनेजिंग, ट्रस्टी, मेंबर सदस्य हे उत्सवाचे आधीं एक-दोन दिवस शिर्डीस येऊन दाखल झाले होते. उत्सवाकरितां मुद्दम मांडव, पताका, तोरणें भक्तांना उतरण्यासाठीं कापडखोल्या, दिव्यांची रोषनाई वगैरे व्यवस्था केली होती. ज्या कलाकारांनीं उत्सवांत श्री पुढें हजेरी दिली, त्यांना श्रींचा प्रसाद म्हणून एकेक रुपया व नारळ देण्यांत आला.

## नवा उपक्रम

यंदांच्या उत्सवांत श्रींच्या पुण्यतिथीच्या दिवशीं गुरुवारीं द्वारकामाईत २४ तास अखंड नामजप चालू ठेवण्याचा नवा उपक्रम करण्यांत आला.

श्रीचे पुण्यतिथी उत्सवानिमित्त संस्थानच्या सर्व नोकरांना प्रत्येकीं रु. ५ पांच प्रमाणें बक्षिस देण्यांत आलें.

उत्सवानिमित्त शिर्डी गांवकरी मंडळी व संस्थानचे नोकर सेवेकरी यांना एक दिवस पक्वान्नाचें जेवण देण्यांत आलें. असो. याप्रमाणें श्रींचा पुण्यतिथी उत्सव उत्तम प्रकारें साजरा झाला.

# नोव्हेंबर १९५७

बाहेरगांवचें भक्तांची गर्दी या महिन्यात नित्याहून अधिक होती.

### श्रीचेपुढें झालेले कार्यक्रमः—

**कीर्तनः**—श्री. ह. भ. प. पोपटबुवा लोहणेकर. श्री. ह. भ. प. आबा फणशीकर मुंबई. श्री. बाबुराव देव वकील, ठाणें (ट्रस्टी) (श्री. सा. सं. शि.) श्री. मराठे गवई यांनीं दोन कीर्तनें केलीं.

**गायन वादनः**—सौ. विमलाबाई देशपांडे, पंढरपूर, श्री. आवडाबाई सांगे-

# गुरु साई पाहिले गोदातिरीं

गुरु साई पाहिलें गोदातिरीं । वाहुनि कुसुमें त्यांच्या शिरीं ।। धृ ।।
भक्तजनांची भोंवति दाटी । हातीं राही सटका काठी ।
संकट सुचवी त्याही वारी । पोंचावि पैलतिरीं ।। १ ।।
यतिवेषें घरिं डहाणु जाउनी । बापू श्यामा सवें घेउनि ।
भोजन करूनी बाळा नयनीं । पाडीं भूल परि ।। २ ।।
दर्शन देऊनि नाना रूपें । रुजवी हृदयीं भक्ती रोपें ।
संत सुरांचे ऐक्य आदर्शी । तत्त्व गहन आचरीं ।। ३ ।।
वाणी कोपुनि तेल न देती । जळती कैशा यांच्या पणती ।
वारीनें त्या सबंध रात्रीं । दीपावली तो करी ।। ४ ।।
गुरुरायाच्या गुणगानीं ती । रमो सदा ही माझी सुमती ।
श्रीपादाची नमुनी विनती । आशिश देशि खातरी ।। ५ ।।

—बाबांच्या बाळाचें बाळ

कर, मुंबई, श्री. अनंत तुकाराम—माशेलकर, मुंबई; कु. शकुंतला पाणसरे, दादर. श्री. कदम, मुंबई, श्री. रामराव परसतवार मुंबई (जलतरंग) श्री. गोविंद परसतवार, मुंबई (तबला) श्री. याकूब आणि कव्वाली पार्टी, कु. चारुशिला सावंत, मुंबई. (नृत्य) श्री. छगनशेट बोगावत, अहमदनगर (व्हायोलिन) श्री. बाबुराव नरोडे, कोपरगांव, कु. शशिकला वसंतराव डिंगणकर मुंबई श्री. विजयकुमार डिंगणकर (तबला) श्री. शांताराम जाधव, श्री. अनिरुद्ध आचरेकर, मुंबई श्री. के. ए. भाटकर, मुंबई.

कार्तिकी महाएकादशी निमित्त श्रींचे पालखीची गांवांतुन मिरवणूक निघाली व कीर्तनाचा कार्यक्रम झाला. चंद्रग्रहणपर्वणीनिमित्त रात्रौ ता. ७।११।५७ गुरुवार रोजीं संस्थानतर्फे अभिषेक पूजा डॉ. गव्हाणकर, मुंबई यांचे हस्तें. मे. चारिटी कमिशनर साहेब व म. चारिटी अकौंटंट डायरेक्टर साहेब, यांनीं श्रीसाईबाबांची पूजा करून संस्थानची सर्व व्यवस्था अवलोकन केली.

संस्थानधर्मार्थ दवाखाना नेहमींप्रमाणें चाललेला आहे.

डी. बी. राणे
सी. बी. वेलकर
संयुक्त चिटणीस

———

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी, या संस्थेनें चालविलेलें

# श्रीसाई लीला त्रैमासिक

संपादक

**श्री. नागेश आत्माराम सावंत**

व्यवस्थापक

**श्री. रामचंद्र महादेव राणे**

## श्रीसाईलीला मासिकासंबंधीं

१ श्रीसाईलीला त्रैमासिकाचे अंक मार्च, जून, सप्टेंबर व डिसेंबर या महिन्यांत ३० तारखेस प्रसिद्ध होतात, तरी पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत अंकाची वाट पहावी. तोंपर्यंत अंक न पोचल्यास लगेच आम्हांला कळवावें. अंक शिल्लक असल्यास अगत्यपूर्वक पुन्हां पाठविला जातो. मात्र अंक शिल्लक नसल्यास त्यासंबंधीं वेगळा पत्रव्यवहार केला जात नाहीं.

२ वर्षारंभ जानेवारीपासून असला तरी वर्गणीदार कोणत्याही महिन्यापासून होता येतें.

३ मागणी केल्यास वर्षारंभापासूनचे अंक शिल्लक असल्यास पाठविले जातात.

४ वर्गणी मनिऑर्डरनें ' व्यवस्थापक श्रीसाईलीला त्रैमासिक कार्यालय, २५ बँक स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १, या पत्त्यावर पाठवावी.

५ या मासिकांत प्रामुख्यानें धार्मिक व तत्त्वज्ञानात्मक स्वरूपाचेच विषय येतात.

**व्यवस्थापक**

वार्षिक वर्गणी
रु. २-४-० (ट. ख. स.)

किरकोळ अंक
दहा आणे

# अनुक्रमणिका

| अ. नं. | विषय | लेखक | पृष्ठ- |
|---|---|---|---|
| १ | श्रीसाईवाक्सुधा | | ७ |
| २ | प्रिय: वाचक | संपादक | ८ |
| ३ | बाबांची लीला | आमचे प्रतिनिधि | ११ |
| ४ | चैतन्यमहाप्रभु उर्फ गौरांग | वाङ्मयप्रभु खं. स. त्रिलोकेकर | २० |
| ५ | श्रीसाई गीतांजली | कवि श्रीपाद | २९ |
| ६ | नामजप | ना. वा. गुणाजी | ४१ |
| ७ | शेवटचा दीन गोड व्हावा– | डॉ. के. भा. गव्हाणकर | ४७ |
| ८ | दिसो साईबाबा गुरूचे ठिकाणी– | शं. बा. दाते | ५२ |
| ९ | संतांच्या उद्‌बोधक आख्यायिका | | ५३ |
| १० | संतकवींच्या सहवासांत | | ५९ |
| ११ | संतांचे चमत्कार | | ६६ |
| १२ | श्रीसाईबाबा पादवंदन | गणेश जगन्नाथ काळे | ७५ |
| १३ | श्रीज्ञानेश्वरमाउलीची ज्ञानोत्तर प्रेमभक्ति | माउलीचा एक चरणरज | ७६ |
| १४ | मराठी पद्यमय रामरक्षा | वि. के. छत्रे | ८२ |
| १५ | भक्तांच्या माहितीसाठी | | ८५ |
| १६ | शिरडी–वृत्त | | ८८ |
| १७ | श्रीगुरुपौर्णिमा–उत्सव | | ९० |
| १८ | साधनेचा अभ्यास | | ९१ |

# लेखकासाठीं सूचना

(१) लेख पानाच्या एकाच बाजूला सुवाच्य अक्षरांत शाईनें लिहिलेला असावा. डाव्या बाजूला भरपूर मार्जिन सोडावी.

(२) लेख, कविता वगैरे साहित्य प्रसिद्धीकरितां स्वीकारणें किंवा न स्वीकारणें अगर त्यांत थोडाफार बदल करणें हा अधिकार सर्वस्वीं संपादकांचा आहे. न स्वीकारलेले लेख परत पाहिजे असल्यास पुरेसें पोष्टेज पाठवावें. नापसंत लेख तीन महिन्यांनंतर निकालांत काढण्यांत येतील.

(३) लेखकानें आपलें पूर्ण नांव व पत्ता कळवावा. टोपण नांवानें लेख प्रसिद्ध करावयाचा असला तरीही पूर्ण नांव व पत्ता ऑफिसच्या माहितीकरतां कळविणें जरूर आहे.

(४) स्वीकृत लेख अंकांत प्रसिद्ध झाल्यावर यथाशक्ति मोबदला देण्यांत येईल.

—संपादक

# श्री साई लीला



## श्री साई वाक्सुधा

लागा बांधा असल्याशिवाय कोणींही कोठें जात नाहीं. मनुष्यास काय पण पशुपक्ष्यांससुद्धां हडहड करूं नये. नेहमीं आल्यागेल्याचा आदर करा. तृषिताची तहान भागवा, भुकेलेल्यांना भाकरी द्या, उघडें पडलेल्यांना बसण्यास ओसरी द्या. असें केल्यानें श्रीहरी तुमच्यावर प्रसन्न होईल. दुसऱ्याचे शंभर बोल ऐकून घ्या, पण त्याला कटु उत्तर देऊं नका. कुणाला पैसे देण्याचे मनांत नसल तर देऊं नका, पण विनाकारण त्याच्या अंगावर श्वानाप्रमाणें वसवसा ओरडूं नका. दुनिया इकडची तिकडे झाली तरी गडबडूं नका. आपलें चित्त श्रीहरीच्या चरणीं स्थिर ठेवा. या सहिष्णुतमुळें अपार सुख लाभेल. आणि त्याच्या लीलेचें कौतुक पहा. 'अल्लामालिक, अल्लामालिक' हें ब्रीद ध्यानीं ठेवा. त्याच्याशिवाय दुसरा कोणी वाली नाहीं. त्याची करणी अगाध व अमोलिक आहे. तो जे करील तेंच होईल, त्याचा मार्ग तोच दाखवील आणि एका क्षणाचाहि वेळ न लागतां तो तुमच्या मनींच्या इच्छा पुरवील. ऋणानुबंधाच्या भाग्यामुळें तुमची माझी भेट झाली, म्हणून परस्परांवर प्रेम करून सुखाचा आनंद भोगूं.

—श्रीसाईसच्चरित

# -प्रिय वाचक-

श्रीसाई-लीलेचा हा पुण्यातीथि-विशेषांक आपल्याला जतन करून ठेवण्याच्या योग्यतेचा वाटावा यासाठीं शक्य ती कोशीस केली आहे. आपण हा प्रयत्न गोड मानून घ्याल अशी दृढ आशा आहे. हा अंक सर्वांगसुंदर तयार करण्याचे कामीं आमचे व्यवस्थापक आबासाहेब राणे यांनीं जी अविश्रांत मेहनत घेतली तिचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केल्यावांचून मला राहवत नाहीं. इतर सहकारी व लेखक यांचेंहि अमोल साहाय्य लाभल्यामुळें हा अंक वैशिष्ट्यपूर्ण काढण्याची माझी आकांक्षा सिद्धीस जात आहे. 'श्रीज्ञानेश्वरमाउलीची ज्ञानोत्तर प्रेमभक्ति' हा 'श्रीज्ञानेश्वरमाउलीचा एक चरणरज' यांचा लेख वाचकांनीं मननपूर्वक वाचावा. हा मार्मिक व रसाळ लेख अगत्यपूर्वक पाठविल्याबद्दल आम्ही त्या अधिकारी लेखकाचे मनःपूर्वक आभार मानतों. श्री. ना. वा. गुणाजी, वाङ्मयप्रभु खं. स. त्रिलोकेकर, इत्यादि सिद्धहस्त लेखकांचें साहाय्य या अंकास लाभलेलें आहे. 'लीले'चे माजी संपादक डॉ. गव्हाणकर यांनींहि अगत्यानें या विशेषांकासाठीं आपला लेख दिला. संत-कार्याचे विविध पैलू दर्शविणारे कांहीं लेख या अंकांत समाविष्ट केले आहेत. संतांचे चमत्कार, संतकवींचें काव्य आणि संतांच्या विभूतिमत्वाचें दर्शन घडविणाऱ्या कांहीं आख्यायिका यासंबंधींचे लेख वाचकांना आवडतील असा मला विश्वास आहे. साईलीलेवर भक्तांचें व सर्वसामान्य वाचकांचें प्रेम अधिकाधिक वाढत असल्याचें दिसून येत आहे. अर्थात् ही सर्व बाबांच्या कृपेची लीला आहे असेंच मी समजतों.

× × ×

चालू अंकाचें एक वैशिष्ट्य म्हणून 'श्रीपाद' कवीच्या 'श्रीसाईगीतांजली' या स्तोत्राचा उल्लेख मला करावासा वाटतो. हें श्लोकबद्ध स्तोत्र साईलीलेकडे केव्हां आलें याची नेमकी तारीख मिळत नाहीं! साईलीलेकडे आलेल्या लिखाणाच्या जुन्या बाडांत हें श्री. ना. वा. गुणाजी यांना आढळलें. त्यांनीं तें आमच्याकडे पाठवून दिलें. 'कवि श्रीपाद' या व्यतिरिक्त स्तोत्र-कर्त्यानें आणखी कांहींहि माहिती स्वतःसंबंधानें आपल्या हस्तलिखितांत दिलेली नाहीं. एक गोष्ट मात्र आम्हीं निश्चित करून घेतली. 'श्रीपाद' या नामसादृश्यानें हें स्तोत्र साईभक्त श्री. बा. देव यांचें आहे कीं काय अशी शंका आली. पण तें त्यांचें नव्हे असें कळलें. स्तोत्र प्रासादिक व गोड आहे म्हणून तें या अंकांत संपूर्ण दिलें आहे. हें भक्तिमधुर स्तोत्र पाठविणाऱ्या साईभक्त श्रीपादकवीला वाचकांच्या वतीनें मी आदरपूर्वक प्रणाम सादर करतों.

× × ×

श्रीसाईबाबांच्या दर्शनास येणाऱ्या भक्तांपैकीं अनेकजण बाबांना प्रेमादरानें विविध वस्तू अर्पण करीत असतात. या वस्तूंसंबंधानें एक गोष्ट सांगावीशी वाटते. बाबांना अर्पण करण्यासाठीं चांदीचीं भांडीं वगैरे भक्त जेव्हां खरेदी करतात तेव्हां त्यांनीं या वस्तु साक्षेपानें पाहून घ्याव्या अशी माझी भक्तांना कळकळीची विनंती आहे. बाबांना अर्पण करण्यांत आलेल्या या वस्तू प्रसाद म्हणून अनेक इतर भक्त विकत घेत असतात. संस्थानकडून या वस्तु घेऊन गेल्यावर त्या देवघरांत वगैरे जपून ठेवण्यापूर्वी स्वच्छ करून आणण्यासाठीं सोनाराकडे दिल्या म्हणजे त्या शुद्ध चांदीच्या नसून मुलामा दिलेल्या तांब्याच्या आहेत, असें अनेकदां भक्तांना आढळून येतें! चांदीची समजून हिणकस धातूची वस्तु संस्थानकडून आपण विकत घेतली, असें दिसून आलें कीं या भक्तांचा पुष्कळदां स्वाभाविकच संस्थानवर रोष होतो! अजाणपणामुळें शिर्डी संस्थानला अशा रीतीनें अकारण कमीपणा येतो. याकरतां यापुढें भक्तांनीं चांदीचीं भांडीं घेतांना तीं खरोखर चांदीचींच आहेत कीं नाहींत याची खात्री करून घेऊन मग तीं बाबांना अर्पण करावीत.

× × ×

अलीकडेच शिरडीस श्रीसाईसमाधीवरील चांदीची छत्री व इतर चांदीचीं पूजेचीं भांडीं चोरीस गेलीं! ही बातमी कानीं आल्यावर अनेक भक्तांनीं एक शंका मला विचारली. ती अशी कीं, बाबांचें हें स्थान इतकें जागृत असतांना आणि त्यांचें सामर्थ्य एवढें अलौकिक असतांना या वस्तू चोरीस कशा गेल्या? अशी चोरी होणें हें जणूं बाबांच्या माहात्म्याला कमीपणा आणणारें आहे अशी आशंका कित्येक लोकांच्या मनांत उभी राहात असते.

या आशंकेचें मूळ अगदीं खोलवर पाहूं गेलें म्हणजे असें दिसेल कीं 'जें आपल्याला योग्य वाटतें तें ईश्वरानें घडवून आणलें पाहिजे' अशी माणसाची मनोमन भावना असते. या भावनेला धक्का बसला म्हणजे त्याची ईश्वरविषयक श्रद्धा लटपटूं लागते. 'मला मानसन्मान व सुखसमृद्धि दिली म्हणजे ईश्वर चांगला, मला दुःख वा दारिद्र्य प्राप्त झालें म्हणजे ईश्वर वाईट' अशी माणसाची साधी कल्पना असते! आपल्या स्वतःच्या या कल्पनेच्या कसोटीवर माणूस सगळ्या घटनांचा अर्थ बसवूं पाहात असतो.

'बाबांच्या पूजेच्या वस्तू चोरीस गेल्या. अशी चोरी होणें हें वाईट आहे. हें वाईट कृत्य बाबांनीं कसें घडूं दिलें?' असा हा युक्तिवाद असतो. ही चोरी वाईट व तिचा शोध लागून चोरांचा बंदोबस्त झाला पाहिजे, ही बऱ्यावाईटाची आपली सामाजिक कसोटी आहे. तीप्रमाणें या चोरीचा संबंध ज्यांच्याशीं पोंचतो ते वागतीलहि. पण बाबांनीं असें कसें घडूं दिलें? हा तात्त्विक प्रश्न विचारला, तर त्याला उत्तर असें कीं, 'जें तुम्हांला अयोग्य वाटलें तसेंच बाबांना वाटत असलें पाहिजे असें तुम्ही कां गृहीत धरतां?' सुकाळ झाला म्हणजे आपण देवाची स्तुति करतों; दुष्काळ पडला म्हणजे देवाला दोष ठेवतों. पण खरा भक्त म्हणतो, 'देवा,

सुख देतोस ही तुझीच कृपा दुःख देतोस हीहि तुझी कृपाच. कारण हीं दोन्ही तूं आमच्या बऱ्यासाठींच घडवितोस अशी माझी श्रद्धा आहे.'

बाबा सर्वसमर्थ आहेत असें ज्यांना वाटत नाहीं, ते या चोरीला कांहीं आक्षेप घेणारच नाहींत. बाबा सर्वसमर्थ आहेत असें ज्यांना वाटतें त्यांचीच श्रद्धा डळमळते. पण त्यांनीं असा विचार करावा कीं ही चोरी घडविण्यांत 'संस्थाननें अधिक जागरूकता व अधिक बंदोबस्त ठेवावा' असा इशाराच बाबांनीं दिला नसेल कशावरून? बाबा देहानें शिरडींत होत तेव्हांहि त्यांच्या अनेक गोष्टी अनाकलनीय आणि गूढगंभीर असत. तशीच हीहि गोष्ट समजली पाहिजे. चोरी झाली या गोष्टीवरून बाबांचें माहात्म्य त्यांचा अध्यात्मांतील अधिकार, त्यांच्या उपदेशाचा महिमा, त्यांचें भक्तप्रेम, आर्त भक्ताच्या हांकेला धांवून जाण्याची त्यांची तत्पर भक्त-प्रीति यांपैकीं कोणत्याच गोष्टीला उणेपणा कां यावा? हट्टी मूल आईच्या अंगावर लाथ झाडतें तेव्हां त्यामुळें आईचा प्रेमळपणा अथवा मोठेपणा कमी होत नाहीं. त्या मुलाचा अजाणपणा मात्र दिसतो. शंभर रुपयांची नोट जाळून तीवर सिगरेट पेटविणारा माणूस पाहिला, तर त्यामुळें नोटेची किंमत कमी होती, असें ठरत नाहीं. त्या माणसाचें मूर्खपण मोठें होतें एवढेंच दिसतें. तसेंच बाबांना शरण जाऊन स्वतःचा उद्धार करून घेण्याची आस न ठेवतां, चांदीच्या वस्तु चोरानें नेल्या. यांत बाबांच्या महिम्याला बाध येत नसून, चोरांच्या स्वार्थप्रियतेची कींव वाटते.

× × ×

पुढील अंक हा चालू वर्षाचा शेवटचा अंक. तोहि आजवरच्या अंकाप्रमाणेंच सरस व वाचनीय काढण्याचा संकल्प, बाबांच्या कृपेवर विसंबून, मीं मनाशीं बाळगला आहे. लेखक-वाचकांनीं गेलीं दोन वर्षें जें अगत्याचें सहकार्य आम्हांला दिलें आहे तेंच पुढेंहि ते चालू ठेवतील अशी माझी खात्री आहे.

× × ×

विजयादशमीला बाबांचा जीवनाकृति पुतळा समाधिमंदिरांत बसविण्यांत येणार आहे. या विशेष समारंभाला स्वाभाविकच भक्तवृंद मोठा जमेल अशी अपेक्षा आहे. संस्थान-समितीचे चालक व इतर कार्यकर्ते हे या प्रसंगीं भक्तांची सर्वतोपरि सोय व्हावी आणि समारंभ यशस्वी रीत्या साजरा करावा, अशी कसोशीनें खटपट करतीलच. या विशेष प्रसंगाचें महत्त्व लक्षांत घेऊन भक्तहि आपल्या परीनें सर्व तें साहाय्य करून या समारंभास अजोड यश मिळवून देवोत अशी भक्तांना माझी मनःपूर्वक प्रार्थना आहे.

—संपादक




संकलक:—आमचे प्रतिनिधि

## बाबांच्या कृपेनें पत्नी रोगमुक्त

देवेंद्रनाथ पंढरीनाथ डेरे. मनमोहन बिल्डींग २ रा माळा, खोली नं. १४, सदाशिव स्ट्रीट, कांदेवाडी, मुंबई नं. ४

'श्रीसद्‌गुरु' साईनाथ बाबांच्या कृपेनें, मी मोठ्या संकटांतून कसा वांचलों त्याबद्दल अनुभव मी खालीं देत आहें.

मी लोकमान्य स्वदेश स्टोअर नांवाच्या कापडाचे दुकानांत साठ–(६०–) रुपये पगारावर नोकरी करतों.

मी विवाहित तरुण आहें. मला एक तीन वर्षांचा मुलगा आहे; व माझें वय २६ वर्षांचें आहे. मुलाखेरीज दोन महिन्यांची एक मुलगी आहे.

मला आई–बाप किंवा सख्या नात्यांत कोणीच नाहीं. फक्त सावत्र आई व सख्खा भाऊ (वय वर्षे २२ चा) आहे. त्यांची मला कोणतीही मदत नाहीं.

सन १९५० सालीं लग्न केलें व चेंबूर येथें संसार थाटला. सन १९५२ च्या जुलै-मध्यें माझी मिलमधील नोकरी अचानक सुटली व मी जवळ जवळ ४।५ महिने बेकार होतों. नोकरी मिळविणेंसाठीं मी पुष्कळच खटपट करीत होतों, पण यश आलें नाहीं.

चेंबूरहून गिरगांवपर्यंत चालत येत असे, पण कोठेंच नोकरी मिळेना. त्यांत घरांत, जवळ पैसे नसल्यामुळें उपवास पडूं लागला. माझी प्रेमळ पत्नी माझेसह ५।५-६।६ दिवस उपवास करूं लागली. त्या वेळचा दिवाळीचा प्रसंग आठवला कीं,अजूनही रडूं येतें. त्या वेळचा प्रसंग म्हणजे बाहेर दिवाळीचे सणाचे दिवस पणत्या, दिवे, फराळाचें करून साजरे केले जात होते, पण माझ्या खोलींत फक्त राकेलचा बारीक दिवा होता. असे दिवस जात होते. व ह्या सर्व गोष्टींचा परिणाम माझ्या पत्नीच्या आरोग्यावर झाला. ती प्ल्युरसीच्या विकारानें आजारी पडली. व त्यांत मी तर बेकार–काय करावें हेंच सुचेना. तेवढ्यांत माझा मित्र श्रीकृष्ण ग. मळेकर हा भेटला व त्यानें बाबांजवळ प्रार्थना कर असें सांगितलें; व मीं त्याप्रमाणें बाबांना प्रार्थना केली.

ती प्रार्थना केल्या दिवसापासून एक महिन्याचे आंतच मला दादर येथें कापडाचे दुकानांत नोकरी मिळाली. व नंतर ओळखीच्या लोकांजवळून कर्जाऊ पैसे घेऊन आजारीपणास तोंड दिलें. तदनंतर मीं पत्नीस तिच्या माहेरीं राजापूर (जि. रत्नागिरी) येथें पाठविलें. त्या अवधींत माझी चेंबूरची खोली, आठ महिन्यांचें भाडें झाल्यामुळें

घरवाल्यानें सामानासुमानासह खोली जप्त केली. मला मात्र जप्त केलें नाहीं. बाकी चमच्यासह सर्व वस्तू नेल्या. माझे संसाराचे भांड्यांची किंमत अंदाजें ३५-४० रुपये होईल इतकीच होती. असो.

सन १९५३ च्या मे महिन्यांत माझी पत्नी गांवाहून आली. नंतर मीं माझे साडू श. ल. कडू-म्हणजे मी सध्यां राहतों तेथें नवीन संसार सुरू केला. मला ही जागा बाबांच्याच कृपेनें मिळाली. पत्नी येऊन ५।६ महिने झाले. तिला दिवस गेले; चार महिने होऊन पांचवा लागला. ५ वा महिना लागून ८-१० दिवस गेले न गेले तोंच तिला कांहींतरी वाटूं लागलें म्हणून मीं तिला प्रिन्सेस स्ट्रीट येथें स्क्रीनिंग करून घेण्यासाठीं नेलें. तेथें स्क्रीनींग केल्यावर त्यांत असें आढळून आलें कीं,-ती फर्स्ट स्टेपवर गेली आहे नंतर डॉ. मंडलीक यांनीं माझ्या पत्नीची केस हातीं घेतली; व त्यांनींच इंजेक्शनें दिलीं.

मीं बाबांना प्रार्थना केली कीं, बाबा माझ्या पत्नीचा रोग बरा होऊंदे, तिला टी. बी. झाला आहे व डॉक्टरांच्या सांगण्याप्रमाणें अशा रोगाला खर्चही खूप येतो. माझी प्रार्थना बाबांनीं ऐकिली व अवघ्या आठच दिवसांत पत्नीचा टी. बी. चा बारीक पाइन्ट निघून गेला.

त्यापूर्वीची हकीगत अशी कीं, पत्नीला टी. बी. झाला हें ऐकून व त्यांत गरोदर, डॉक्टरानें तिला पुष्कळच जपण्यास सांगितलें; व पथ्य-पाणी नीट करण्यास सांगितलें. मटन, कवठ, दूध, केळीं, अशाप्रकारें पथ्य देण्यास सांगितलें. माझी स्थिती अशाप्रकारें खाणें देण्याची नव्हती. इंजेक्शनें, औषधें, पथ्यपाणी, हा एवढा खर्च बघितला-कमींत कमी पांच सहाशें रुपये होईल, एवढा होता...मी गरीब, ६० रुपये पगार, त्यांत लोकांचें कर्ज, जवळपास कोणी मदत करील असें कोणीच नाहीं. इकडे तर पत्नी जर्जर रोगानें आजारी; औषधाला जवळ पैसे नाहींत. काय करावें, सुचेना. कोणाकडे पैसे मिळण्याची आशा नसल्यानें जीव वैतागून गेला. काय करावें हें कांहींच सुचेना. शेवटीं गवालिया टॅंक येथें असलेल्या बाबांच्या मठांत गेलों व त्यांचे चरणावर जवळ जवळ पाऊण तास रडलों व त्यांना प्रार्थना केली कीं, बाबा माझ्या पत्नीला वांचवा. तिचा टी. बी. चा पाइन्ट जाऊं दे. ती चांगली बरी होऊं दे. तिला कोणताहि त्रास होणार नाहीं, व सुखरूप तऱ्हेनें चांगली बाळंत होईल तर मी शिर्डीला चालत जाईन असा नवस केला. व त्याप्रमाणें माझी पत्नी प्रार्थना केल्यापासून आठ ;दिवसांत टी. बी. च्या रोगांतून वांचली व नंतर डॉक्टरचे सल्ल्यानें तिला मीं गांवीं पाठविलें.

आनंदाची गोष्ट अशी कीं, माझी पत्नी ता. २७।३।५४ रोजीं सुखरूपपणें बाळंत होऊन तिला कन्यारत्न झालें. अशा तऱ्हेनें बाबांची माझ्यावर कृपा झाली.

खरोखर शुद्ध अंतःकरणानें बाबांचें ध्यान-भक्ति केली असतां, बाबा त्या भक्ताला जरूर साहाय्य करतात व वेळप्रसंगीं धांवतात. मी पुन्हां श्री समर्थांच्या चरणीं मस्तक ठेवून प्रार्थना करतों कीं, असेंच प्रत्येक भक्ताच्या हांकेला धांवा.

★

## हरवलेली फाईल आली ! परीक्षेंत यश

**श्री.** पी. डी. कुळकर्णी, क्लार्क, ७० सप्लाय प्लॅटून्स, ए. एस. सी, देवळाली, जि. नाशिक.

(१) मी मिलटरी डिपार्टमेंटमध्यें (ए. एस. सी.) क्लार्क आहें.

एकदां असें झालें कीं, जुलई १९५३मध्यें आमच्या ऑफिसमधील एक कारेस्पॉन्डन्सची फाईल गहाळ झाली. त्या फाईलची जबाबदारी माझेवर असलेमुळें मीं ती शोधून काढण्यासाठीं आमच्या ऑफिसचा कोनाकोपरा १२।१३ दिवस धुंडाळून पाहिला. पण काहींच तपास लागला नाहीं. व या कारणामुळें मला रात्रंदिवस चैन पडेना व नोकरीवर तो वाईट ठपका येईल म्हणून फार घाबरून गेलों. तेव्हां एके दिवशीं साईबाबांना मीं नम्रतेनें असा नवस केला कीं, बाबा, ही फाईल जर आपण मला मिळवून द्याल तर मी आपल्या दर्शनास शिर्डीला येईन व जन्मभर मी आपली सेवा व भक्ति करीत राहीन. त्याप्रमाणें बरोबर चौथ्या दिवशीं ती फाईल पुण्याहून परत आली. त्यानंतर ४।५ दिवसांतच ४ आगष्ट १९५३ पासून मला आपोआप न मागतां दोन महिन्यांची रजा मिळाली. व मी शिर्डी येथें बाबांच्या दर्शनाला आलों व आपला वेळ त्यांच्या भक्तींत घालविला. त्यानंतर माझ्या धाकट्या भावाला त्याच महिन्यांत मुंबईला नोकरी लागली. व डोंबिवली येथील आमच्या बिऱ्हाडाचें घरभाडें घरमालकानें ३५ रु. ऐवजीं २८ रु. केलें

(२) माझा एक मित्र मॅट्रीकचे परीक्षेंत दोन वेळां नापास झाला; व त्यामुळें फार निराश झाला. एके दिवशीं मीं त्याला साईबाबांचें चरित्र व मला आलेले अनुभव त्याला सांगितलें व माझ्याजवळ असलेल्या फोटोस एक हार घालणेस व प्रार्थना करणेस सांगितलें; व साईबाबांची विभूती पण रोज लावणेस व परत अभ्यास करणेस सांगितलें. व मीहि त्याच्या कल्याणासाठीं बाबांजवळ कवड्या उद (धूप) दाखवून प्रार्थना केली. त्याप्रमाणें तो माझा मित्र १९५३ आक्टोबरमध्यें झालेल्या मॅट्रिक परीक्षेंत पास झाला. आतां तो मित्र साईबाबांची रोज सेवा करीत आहे. आतां त्याची इच्छा नोकरीला लागलेवर शिर्डी येथें बाबांचे दर्शनास येण्याची आहे.

★

## बाबांच्या कृपेनें 'बी. टी.' झाला

**श्री.** नारायण सोनाजी भोपळे, बी. ए., बी.टी. राहणार, जळगांव, जि. बुलढाणा]

मी सप्टेंबर सन १९५३ पासून ता. २०-३-५४ पर्यंत एकसारखा मधून मधून आजारी होतों, त्यामुळें मी अभ्यासाचें पुस्तक एकदांसुद्धां वाचूं शकलों नाहीं. त्यामुळें ता. २२-३-१९५४ रोजीं सुरू होणाऱ्या बी. टी.च्या परीक्षेस जावयाचें नाहीं असा बेत केला. पण माझे मित्र मुकुंदराव देशपांडे यांनीं श्रीसाईबाबांचें लॉकेट माझे गळ्यांत घातलें व उदी खाण्यास देऊन मला ता. २१-३-५४ रोजीं माझे गावांहून सुमारें दोनशें मैलांचे अंतरावर मला परीक्षेस पाठविलें. मला फक्त परीक्षेचे वेळे पुरतेंच बरें वाटे व मी श्रीसाईबाबांच्याच कृपेनें परीक्षेंत उत्तीर्ण झालों. श्री बाबांची लीला अघटित आहे यांत मुळींच शंका नाहीं.

★

## असाध्य दुखणें बरें झालें

**श्री.** रामचंद्र देवजी पाटील, रा. कोळगांव-सांगवी, ता. सिन्नर, जि. नाशिक.

तीनचार वर्षांपासून श्रीसाईबाबांच्या कीर्तीसंबंधीं, व तसेंच ते मनांतील दुःख नाहींसे करतात व नवसास पावतात असें ऐकत आलों. मग मनांत उपरति झाली कीं, एक वेळ शिर्डी येथील श्रीसाईबाबांचा सोहळा काय आहे तें पाहून श्रीसाईबाबांचें दर्शन घेऊन यावें. त्याप्रमाणें मी श्रीबाबांच्या दर्शनास एका गुरुवारीं आलों. तेथील एकंदर सोहळा म्हणजे पहांटेची काकड आरती, नंतर श्रींचें मंगल स्नान, पुढें भक्त लोक पूजाअर्चनाकरितां भाविकपणानें रांगेत उत्सुकतेनें उभे राहिलेले पाहून फार आनंद वाटला. त्याचप्रमाणें साडेबाराचे आरतीची गडबड, रात्रीं पालखीची मिरवणूक व शेजआरती वगैरे पाहून मन अगदीं रमनू गेलें. नंतर मी ३-४ गुरुवारीं मोठ्या भाविकपणानें श्रींचे दर्शनास आलों. पुढें माझा मुलगा चि. भाऊसाहेब हा आजारी पडला. त्यांस डॉक्टर व वैद्य यांचें औषध दिलें, परंतु पुष्कळ खर्च करून कांहीं गुण आला नाहीं. असें सुमारें एक वर्षभर औषध दिलें, परंतु गुण तर आला नाहींच पण दुखण्याची परिक्षासुद्धां झाली नाहीं; व तो जगेल किंवा नाहीं याचा भरंवसाही वाटेना. अशा परिस्थितींत शेवटीं मी कंटाळून गेलों, व शिर्डीस श्री बाबांचे दर्शनास येऊन त्यांचेवर सर्व भार टाकून मनोभावानें प्रार्थना करून नवस केला कीं, 'माझा मुलगा ह्या दुखण्यांतून बरा झाल्यावर तुम्हांस सव्वा तोळे सोनें अर्पण करीन.' नंतर दोन महिने प्रत्येक गुरुवारीं श्री बाबांचे दर्शनास येऊन उदी घेऊन जाऊं लागलों व घरीं आल्यावर त्या मुलास दररोज सकाळ-संध्याकाळ उदी त्याचे कपाळास लावून थोडी खाण्यास देऊं लागलों. दोन महिन्यांनंतर त्यास गुण येऊन हळूहळूं हिंडू फिरूं लागला. आतां तो पूर्ण बरा झाला म्हणून मोठ्या आनंदानें मुलाबाळांसह श्रींचे दर्शनास व मी 'वर बोललेल्या नवसाची' सांगता करण्याकरितां आलों व सव्वा तोळे शुद्ध सोनें श्रीस अर्पण केलें.

★

## फिटचें दुखणें गेलें

**श्री.** शिवहारी लक्ष्मणराव जाळींद्रे, ५१८ वेताळ पेठ, पुणें २.

मी मानसिक व शारिरीक व्यथेनें (फिट्सनें) दोनतीन वर्षें आजारी असल्यानें डॉक्टर-वैद्यांचे पुष्कळ औषधोपचार केले, परंतु गुण कांहीं आला नाहीं. तेव्हां खालील माहिती 'श्री सद्‌गुरु साईबाबांच्या महतीविषयीं' माझे वडील बहिणीकडून मिळाली.

'पुणें येथें बुधवार पेठेंत पासोड्या विठोबाचे मंदिरानजीक साईभक्त श्री. भाऊसाहेब लोंबर हे राहतात. त्यांचेकडे दररोज श्रीसाईबाबांची पूजा आरती होत असते. त्यांतले त्यांत मंगळवार व गुरुवार हे महत्त्वाचे दिवस मानतात. ते दिवशीं नेहमींप्रमाणें

पूजा आरती होऊन भजन वगैरे करतात. तेथें जाऊन तूं श्रीसाईनाथ महाराजांची भक्ती कर. त्यांचे उपासनेनें पुष्कळांना गुण आले व येतात. त्याचप्रमाणें श्रींची कृपा झाल्यास तुलाहि गुण येईल व तेथें आणखी श्रीबाबांची कीर्ती इतरांकडून तुला ऐकावयास मिळेल.' त्याप्रमाणें मी तेथें दर मंगळवारीं व गुरुवारीं श्रीचे दर्शनास व पूजा-आरतीस जाऊं लागलों. व त्यांचे उदी व तीर्थ घेऊन येऊं लागलों. तेथेंही इतरांकडून श्री साईसाथमहाराजांचें मूळ स्थान शिर्डी असून ते भक्तांचें कोणतेंहि व कसलेहि संकट आल्यास जे सद्भावनेनें त्यांना शरण जातात त्यांचे ते संकट निवारण करतात असें कळलें. हें ऐकून माझीही भावना त्यांचे ठिकाणीं बसून भक्ति करूं लागलों. वर सांगितलेली उदी घेऊन आल्यावर रोज सकाळीं व संध्याकाळीं शुचिर्भूत होऊन कपाळास लावूं लागलों, व तीर्थ घेऊं लागलों. त्याच वेळेस नवस केला कीं, 'मला थोडा गुण दिसूं लागतांच मी शिर्डीस येऊन तुमचे समाधीस चांदीच्या पत्र्याच्या पांच पणत्या अर्पण करीन व पांच गोरगरिबांना अन्नदान करीन.' वर सांगितल्याप्रमाणें भक्ती करूं लागल्यानंतर थोड्याच दिवसांत रोगास उतार पडूं लागला, व फिटस् येण्याचें कांहीं दिवसांनीं बंद पडूं लागलें; जर एखादे वेळेस आली तर ती अगदीं थोडा वेळ म्हणजे दोनतीन मिनिटें राहूं लागली. ह्या माझ्या सुरुवातीच्या अनुभवावरून श्री साईबाबांवर दृढ विश्वास बसून पक्की खात्री वाटूं लागली कीं, श्री बाबाच ह्या माझ्या रोगांतून मला बरे करतील. आज रोजीं साईबाबांस नवस फेडण्याकरतां शिर्डीस आलों व चांदीच्या पणत्या श्री बाबांस अर्पण करून दर्शन घेऊन ५ गरिबांस अन्नदान केलें. याप्रमाणें समाधीचें दर्शन घेतल्यावर आरती वगैरे पाहून मला एक प्रकारचा आनंद व मनःस्वास्थ्य वाटून आपण लौकरच बाबांच्या कृपा व आशीर्वादानें बरें होऊं अशी खात्री वाटूं लागली.

★

## उदीचा प्रभाव

**डॉ.** पी. एस्. साशितल, तालमाकी वाडी, ताडदेव रोड, मुंबई, ७

चार वर्षांपूर्वी मी बेळगांवीं गेलों होतों. तेथें माझे साडू श्री. डी. जी. होसंगडी, पी. ए. टू कलेक्टर होते. त्यांनीं श्रीबाबांचें चरित्र वाचावयास देऊन त्यांची ख्याती सांगितली. ते श्रींचे निस्सीम भक्त आहेत व त्यांना ही माहिती स्वामी गुरुचरणानंद यांचेकडून व इतरांकडून मिळाली. कारण स्वामींचें नेहमीं येणें-जाणें त्यांचेकडे (श्री. होसंगडी यांचेकडे) होतें. मी तेथें त्यांचे घरीं असतांना त्यांना सरकारी व खाजगी संकटाचे वेळीं त्यांचें [ श्रींचें ] नांव घेतलें असतांना स्वप्नांत त्यांना दृष्टान्त होऊन संकट निवारण होत असे. हें प्रत्यक्ष माझ्या दृष्टोत्पत्तीस पडत असल्यामुळें श्रीबाबांवर माझी पूर्ण भक्ती जडली व डिसेंबर १९५३ मध्यें मी घरचे मंडळीस, मुलांसह शिर्डीस श्री साईनाथमहाराजांचे दर्शनास पाठविलें.

माझे दुसरे साडू श्री. आर. आर. विजूर, ( गोरेगांवकर बिल्डिंग, गांवदेवी,

मुंबई ) यांना श्रीबाबांची भक्ती करण्यास श्री. होसंगडी यांनींच खालीं निर्दिष्ट केल्याप्रमाणें सांगितलें. कारण श्री. बिजूर यांची पत्नी सौ. इंदीराबाई बिजूर ह्या १०–१२ वर्षांपूर्वी चालतांना रस्त्यांत पडल्या व तेव्हांपासून डाव्या पायानें त्यांना चालतां येत नसे. त्यांना सर्व प्रकारचे औषधोपचार डॉक्टर–वैद्यांचे केले, परंतु गुण येईना. सदर दुखणें इतकें त्रासदायक झालें कीं, कैक महिने एके ठिकाणीं बसून काढले. अशा परिस्थितींत, श्री. बिजूर हे वैतागून गेले होते; व काय करावें तें सुचेना. त्यावेळेस त्यांना १९५३ सालीं श्री. होसंगडी यांनीं सांगितलें कीं, तुम्ही श्रीसाईनाथ महाराजांचा फोटो आणून त्यांची रोज पूजा अर्चा करून, हार–फूल वाहून धूप–दीप लावून प्रमळ अंतःकरणानें भक्ती करीत जा; विशेष करून गुरुवारीं करीत जा. श्रीबाबांची उदी–भस्म दुखऱ्या पायांस चोळून थोडी कपाळास लावून तीर्थ घेत जा. याप्रमाणें सुरुवात केल्यापासून दोघांचे मनास स्वस्थता लाभून कांहीं दिवसांनीं हळू-हळू चालतां येऊं लागलें व पायाचें दुःखही कमी वाटूं लागलें.

त्यावेळेस सौ. इंदीराबाई बिजूर यांनीं नवस केला कीं, पूर्ण गुण आल्यावर एक वर्षाचे आंत मी स्वतः शिर्डीस तुमचे (श्रीसाईबाबांचे) दर्शनास येईन व शाल वाहीन. त्याप्रमाणें त्यांना गुण आला व बोलल्याप्रमाणें आज ता. २७–४–५४ रोजीं आम्हीं सर्व शिर्डीस श्रींचे दर्शनास येऊन ता. २९–४–५४ रोजीं वर बोलल्याप्रमाणें नवसाची पूर्तता केली.

त्याचप्रमाणें माझे व माझ्या पत्नीचे बिकट प्रसंगीं आम्ही श्रीबाबांचें स्मरण करून अनन्य शरण गेलों असतां त्या बिकट प्रसंगाचा परिहार होतो, असा आमचा स्वतःचा अनुभव आहे.

★

## एक विलक्षण अनुभव

**श्री.** पी. आर्. सोनी, १३०६ वंजारगल्ली, अहमदनगर.

सन १९५१ च्या मे महिन्याच्या रविवार सकाळमध्यें श्रीसाईबाबांची माहिती आल्यामुळें गुरुवारीं कांहीं मित्रमंडळीसह स्पेशल मोटार करून प्रथमदर्शनाकरितां गेलों. त्यानंतर मागील पुण्यतिथीपर्यंत बरेच वेळां दर्शनाकरितां गेलों होतों. १९५१ च्या जूनपासून १९५३ च्या गुरुपौर्णिमेपर्यंत दर आठवड्यास बुधवार ते शनिवारपर्यंत शिरडींतील कोणत्या ना कोणत्या स्थानाचें दर्शन स्वप्नामध्यें होत होतें. परंतु १९५३ च्या गुरुपौर्णिमेनंतर शिरडींतील दर्शन स्वप्नामध्यें न झाल्यामुळें १९५३ दिवाळीचे दिवशीं बाबांच्या फोटोसमोर बसून मीं प्रतिज्ञा केली कीं, जोंपर्यंत स्वप्नांत अगर प्रत्यक्ष ( कोणत्याही रूपानें ) दर्शन होणार नाहीं तोंपर्यंत मी डोक्यावरील केस व दाढी वाढविणार. त्याप्रमाणें मीं दाढी वाढविली. त्याचें फळ शुक्रवार ता. १८–६–५४ रोजीं दुपारीं मिळालें. नेहमींच्या पद्धतीप्रमाणें दुपारीं १२॥ वाजतां

जेवत बसलों असतांना दारासमोर, कोणी साईचा भक्त भिक्षा घालील काय, असा आवाज आला म्हणून मुलीस भाकर वाढण्यास सांगितलें व मुलास एक पैसा देण्याकरितां सांगितला. परंतु भाकरही घेईना व पैसाही घेईना. म्हणून मीं ताटावरून उठून काय प्रकार आहे तो पाहाण्याकरितां गेलों, तर त्यांनीं सांगितलें कीं मला भिक्षा नको, फक्त तुझा हात पाहण्याची इच्छा आहे. मी त्यांना घरांत बोलावलें. त्यांनीं हात हातांत घेऊन आजतागायतची इत्थंभूत हकीगत खडान् खडा खरी सांगितली नंतर त्यांनीं जरीच्या फेट्याची मागणी केली. परंतु घरांत नसल्यामुळें मीं देऊं शकलों नाहीं. त्या ज्योतिषीबाबांनीं सांगितलें कीं, मला माहित आहे घरांत फेटा नाहीं; परंतु बारा महिन्यांत मला जरीचा फेटा केव्हांही दे. त्यानंतर अमक्या ठिकाणच्या गादींमधील चॉकलेट रंगाची शाल मला पाहिजे म्हणून सांगितलें. त्याप्रमाणें मीं शाल आणण्यास मुलीस सांगितलें व मुलीस व भावजयीस श्रीसाईलीलामध्यें आलेले अनुभव यासारखे यदाकदाचित् श्रीसाईबाबा आपली परीक्षा पाहाण्याकरितां आले असतील म्हणून सांगितलें व मुलास चुलत भावास बोलावण्याकरितां दुकानीं पाठविलें. भाऊ आल्यानंतर त्यांचे हात पाहून त्याच्या मुलीचे मृत्यु वगैरे गोष्टी सांगितल्या. नंतर त्यांनीं दक्षणा म्हणून सव्वादोन रुपयांची मागणी केली. परंतु तितके पैसे मजजवळ नसल्यामुळें कोटांत होते तितके पैसे (फक्त सात आणे) दिले. नंतर भावाजवळ मागणी केली. परंतु त्यांनीं आठ आणे दिले. त्यावेळेस बाबा म्हणाले कीं, खिशांत इतक्या नोटा असून फक्त आठच आणे कां देतां? परंतु, ते पैसे मालकाचे बँकेंत भरण्यासाठीं चाललों होतों, बोलावणें आल्यामुळें मी आलों; माझ्या मालकीचे पैसे जे होते ते आपणांस मीं दिले असें सांगितलें. नंतर भावजयीजवळ एक रुपया होता तो तिनें दिला. परंतु बाबांनीं सांगितलें कीं, घरांत पेटीमध्यें कागदाच्या पुडीमध्यें सव्वादोन रुपये आहेत त्यांतील देऊन माझी दक्षणा पूर्ण करा. परंतु माझी मंडळी लासलगांवीं (माहेरीं) गेल्यामुळें तिच्या पेटींत असेल परंतु किल्ली नसल्यामुळें बाकीची रक्कम देऊ शकलों नाहीं. नंतर त्यांनीं पुढील कांहीं भविष्य सांगितलें. त्याप्रमाणें कांहीं अनुभवास आलें व कांहीं भविष्याची मुदत लांब असल्यामुळें अनुभव यावयाचा आहे. घरांत अर्धापाऊण तास बसले होते. काय विचारावें याबद्दल कांहींच न सुचल्यामुळें सर्वजण भांबावून गेलों. नंतर ते घराबाहेर पडल्यामुळें १५-२० सेकंदांनीं मी दाराबाहेर पाहातों तर दिसलेच नाहींत. नंतर मनाची पक्की खात्री झाली कीं, श्रीसाईबाबाच आपली परीक्षा पाहण्याकरितां येऊन गेले. त्यांच्या सांगण्यानुसार मीं साईचरित्राचें पारायण केलें व आषाढ शु॥ १५ गुरुपौर्णिमेच्या दिवशीं समाप्ती केली. समाप्तीनंतर एका आठवड्यांत माझी मंडळी लासलगांवाहून येथें आली व तिजजवळ सव्वादोन रुपयांच्या पुडीबद्दल चौकशी केली. त्याप्रमाणें ती पुडी सांपडली. सवडीनुसार ज्यावेळीं शिरडीस जाणें होईल त्यावेळीं अर्पण करूं. पारायणाच्या समाप्तीनंतर मीं दाढी केली आहे.



★

## बाबांच्या कृपेचा अनुभव

सौ. विमल आर. पाणी, २१ नागसंद्र रोड, बसवनगुडी, बंगलोर नं. ४.

मी व आई जून २७, १९५३ ला पुण्याहून निघून २८ तारखेला बंगलोरला पोहोंचलों. तेथें गेल्यावर ८ दिवसांनीं, म्हणजे जुलै ६ तारखेला, आईच्या पोटांत दुखूं लागलें. माझ्या मावशीच्या घरासमोरच एक डॉक्टर रहात होते, त्यांना बोलावून औषध दिलें. पण पोट दुखणें कांहीं थांबेना व संध्याकाळीं तर जास्तच दुखूं लागलें. म्हणून संध्याकाळीं तेथील एका मोठ्या डॉक्टरनां दाखविण्यासाठीं नर्सिंग होममध्यें नेलें. इंजक्शनें, औषधें वगैरे दिल्यानंतर जरा बरें वाटलं. डॉक्टरनीं आईस नर्सिंग होममध्यें २–३ दिवस रहाण्यास सांगितलें.

परंतु ८ जुलै १९५३ ला संध्याकाळीं आईस एकाएकीं अतिशय थंडी वाजून आली. व 'हार्ट-अॅटक्' झाला. डॉक्टरही अतिशय घाबरून गेले व त्या रात्रीं सर्व रात्रभर 'ऑक्सिजन' देण्यांत आला. डॉक्टरनींही धीर सोडला व सांगितलें कीं, आतां कांहीं सांगतां येत नाहीं, त्याकरितां आतांच त्यांच्या मुलाला तार दऊन लगेच बोलावून घ्या.

माझा भाऊ त्यावेळेस पुण्यांत होता. त्याला दोन तारा दिल्या व तो दुसऱ्या दिवशीं म्हणजे ९ जुलै १९५३ ला गुरुवारीं विमानानें बंगलोरला आला. ८ तारखेस रात्रभर मी श्रीसाईबाबांची सारखी प्रांर्थना करीतच होतें. तसेंच दादाही पुण्याहून बंगलोरला विमानानें प्रवास करीत असतांना श्रीसाईस्तवनमंजरी व श्रीसाईसगुणोपासना वाचीत होता व श्रीबाबांना आईला लौकर बरें करण्यास प्रार्थना करीत होता. व आश्चर्य म्हणजे माझा भाऊ बंगलोरला येऊन पोंचेपर्यंत श्रीबाबांच्या कृपेनें आईला बरें वाटूं लागलें होतें.

तेथील डॉक्टरनें 'गॉलब्लॅडर' मध्यें खडा झाला आहे असें सांगितलें व लौकर ऑपरेशन करून घेण्यास सांगितलें. परंतु दोनचार डॉक्टरनां दाखविल्याशिवाय कांहीं करावयाचें नाहीं असें आम्हीं ठरविलें. नंतर ३ महिने आईला थोडी विश्रांती मिळावी म्हणून आम्ही बंगलोरला राहिलों.

नंतर पुण्यास परत आल्यावर येथील एका मोठ्या डॉक्टरनां दाखविलें. डॉक्टरनीं एक X-ray काढला, त्यांत कांहीं खडा वगैरे दिसला नाहीं. म्हणून आदल्या दिवशीं पोटांत औषध देऊन दुसऱ्या दिवशीं पुन्हां एक X-ray काढला, परंतु त्या फोटोंत सुद्धां खडा वगैरे कांहीं आढळला नाहीं. दुसऱ्या दिवशीं परत तेंच औषध पोटांत दिलें व तिसऱ्या दिवशीं आणखीन् एक तिसरा X-ray काढला व आश्चर्य म्हणजे श्रीबाबांच्या कृपेनें त्या तिसऱ्या फोटोंत सुद्धां खडा वगैरे कांहींच आढळून आला नाहीं व डॉक्टरनीं खडा नाहींच असें ठाम सांगितलें.

बंगलोरमध्यें आईची प्रकृती बरी नसल्यापासून आई रोज थोडी ' उदी ' पाण्यांत टाकून औषधासारखें घेत होती, व त्यामुळें तो खडा जरी असला तरी तो निश्चितच विरघळून गेला आहे, अशी खात्री झाली. श्रीबाबांच्या उदीसारख्या औषधापुढें दुसऱ्या औषधांचा काय उपयोग ? श्रीबाबा खरोखरीच " वैद्यांचे वैद्य " आहेत.

आईला बरें वाटल्यावर शिरडीस जाऊन श्रीबाबांचें दर्शन घ्यावयाचें व साई सत्यनारायण पूजा करायची असा आम्हीं नवस केला होता. परंतु काहीं कांहीं कारणामुळें शिरडीस लौकर जातां आलें नाहीं.

त्याची आठवण देण्याकरितां म्हणूनच कीं काय मंगळवारीं ता. १५ डिसेंबर १९५३ ला आईच्या पोटांत परत एकाएकीं दुखूं लागलें. व आम्ही अगदींच घाबरून गेलों. माझा भाऊ ऑफीसमध्यें गेला होता. इतक्यांत कोणीतरी दार ठोठावल्याचा आवाज झाला व दरवाजा खोलो असें मोठ्यानें ओरडलें. दार उघडून पाहिलें तर श्रीबाबांच्या एक भक्त व गायिका श्रीमती कमलम्मा रायचूरकर ह्या दिसल्या. त्यांचीं शिरडीस नेहमीं भजनें होतात. त्या शिरडीस जाऊनच येथें आल्या होत्या. त्यांनाहि पुण्यास येण्यापूर्वीं एक स्वप्न पडलें होतें म्हणे कीं, श्रीबाबांनीं त्यांना सांगितलें कीं पुण्यास तुमच्या ओळखीचे एक साईभक्त आजारी आहेत त्यांना पुण्यास जाऊन जरूर भेटा व प्रसाद व उदी न विसरतां द्या. श्रीमती रायचूरकर पुढें असेंहि म्हणाल्या कीं, त्यांना जर हें स्वप्न पडलें नसतें तर त्या पुण्यास वाटेंत न उतरतां, मुंबईहून थेट रायचूरला गेल्या असत्या.

नंतर माझा भाऊ त्यांच्या खोलीवर जाऊन शिरडीहून आणलेलें श्रीबाबांचें तीर्थ, उदी व प्रसाद घेऊन आला. तीर्थ दिल्याबरोबर पोटांत दुखावयाचें हळूहळूं कमी झालें. आईला बरें करण्यासाठींच श्रीबाबांनीं श्रीमती कमलम्मा रायचूरकर यांचेबरोबर तीर्थप्रसाद, उदी पाठविली होती यांत कांहींच शंका नाहीं. तसेंच आम्ही शिरडीस लौकर गेलों नाहीं म्हणून श्रीबाबांनीं आम्हांला आठवण करून दिली. त्याप्रमाणें आई, माझा भाऊ व मी तिघेजण लौकर शिरडीस जाऊन श्रीबाबांचें दर्शन घेतलें व श्रीसाईसत्यनारायण पूजा केली.

वाङ्मयप्रभु : खं. स. त्रिलोकेकर

# चैतन्यमहाप्रभु उर्फ श्रीगौरांग

## यांच्या जीवनांतील दोन उदात्त प्रसंग*

**कोठेंही ज्ञा साधूंचें वर्तन । अथवा त्यांची रहाणी चलन ।**
**एकाचें एक एकाचें आन । नसतें समसमान कोठेंही ॥**

—सा. सच्चरित, अ. ४९, ओं. १७

गेल्या एप्रिल महिन्यांत कांहीं दिवस मी शिरडींत होतों. नवलकरवाड्यांत श्रीसाईच्या गुरुपादुकांसमोरील एक खोली आम्हांला मिळाली होती. एके दिवशीं दोन प्रहरीं भोजनोत्तर आतां काय करावें ह्या विचारानें मी वाड्यांत उभा राहिलों. उन्हाचा रखरखीतपणा जास्त भासत होता. मी उभा होतों तेथून गुरुपादुकेजवळील कोनशिला, श्रीसाईबाबांची सुंदर तसबीर व त्याच्या बाजुला निंबवृक्षाचा पार दिसत होता. समोर एका लांकडाच्या पेटाऱ्यावर धूपपात्र होतें. त्यांतील उदी लावून तेथून त्या निंबवृक्षाच्या वर दिसणाऱ्या समाधिमंदिराच्या सुवर्ण–कळसास अभिवादन केलें. त्या निंबाचीं कातर पानें वाऱ्याच्या लहरीबरोबर आंदोलन घेत होतीं. ही क्रीडा पहातांच श्रीसाईबाबांना निंबाची इतकी आवड कां ? हा विचार माझ्या मनांत आला. इतक्यांत एक पान भिरभिरत माझ्या अंगावर पडलें. एका कल्पनेवरून तत्सम दुसऱ्या कल्पनेचा उगम होणें यांस 'कल्पना–संगति' न्याय म्हणतात. ह्या न्यायाप्रमाणें मला त्या पानावरून चैतन्य प्रभु उर्फ निमाई पंडित यांचें स्मरण झालें. श्रीसाईबाबांच्या गुरुपादुकांचें स्थान जसें निंबाच्या तळवटीं आहे, त्याचप्रमाणें श्रीचैतन्य प्रभूंचें प्रसवगृह हें सुद्धां निंबाच्या तळवटीं होतें. 'नीम' अर्थात् 'निंबवृक्षाखालीं जन्मलेले' म्हणून 'निमाई' असें त्यांचें नांव पडलें; आणि शेवटपर्यंत चैतन्य प्रभूंना लोक निमाई पंडित ह्या नांवानें ओळखत असत.

बंगालमधील नदिया जिल्ह्यांत नवद्वीप गांवीं शके १४८५, फाल्गुन शु॥ पौर्णिमेस त्यांचा जन्म झाला. त्यांचें घरचें नांव विश्वंभर असें होतें. रंगानें अत्यंत गौर, उत्तप्त कनकासारखी सतेज कांति, विशाल व तेजस्वी नेत्र, रेखीव अवयव व अत्यंत मनोहर असें त्यांचें मुख पहातांच पहाणारांना पुन्हां पुन्हां पहातच रहावें अशी त्यांची मूर्ति

---

***टीपः**–Lord Gauranga, in 2 Volumes, by Shishir Kumar Ghose. श्री चैतन्यचरितावलि (हिन्दी) १–५ भाग. —प्रभुदत्त ब्रह्मचारी. या ग्रंथांच्या आधारें.

सुंदर व आकर्षक होती. त्यांचें चरित्र अनेक अद्‌भुत व चमत्कारिक लीलांनीं भरलेलें आहे. लोक त्यांना साक्षात् श्रीकृष्णाचे अवतार असें समजत असत. ह्या संताच्या चरित्रांतील साहित्याच्या दृष्टीनें दोन उदात्त प्रसंग ह्या लेखांत चित्रित करावयाचे आहेत.

संत हे वाङ्मयीन वादाकडे कोणत्या दृष्टीनें पहातात ह्या दृष्टीची ओळख ह्या दोन प्रसंगांवरून रसिक वाचकांस होईल. आपला नेहमींचा अनुभव असा आहे ' न तेजस्तेजस्वी प्रसृतमपरेषां विषहते ' ह्या कविवचनाप्रमाणें साहित्यिक आणि पंडित यांना एकमेकांचें वर्चस्व सहन होत नाहीं. हा मनुष्यस्वभाव जुनाच आहे. हे साहित्यिक एकदां वादास उभे राहिले कीं, आपल्या प्रतिपक्षीयांस ह्या जगांतून उठवून नेस्तनाबूद कसें करावें ह्या हिरीरीनें सरसावतात. याच्या उलट संतांची दृष्टि असते. एक तर संत वादविवादाच्या भरीस कधीं पडत नाहींत, व यदाकदाचित् पडले तर त्यांच्या वादाचें पर्यवसान प्रतिपक्षीयांस सर्वतोपरी कल्याणप्रद होईल असेंच असतें. साहित्यिकांच्या डोकींत घोळत असलेल्या चुरशीच्या क्षुद्र कल्पना त्यांच्या मनाला कधींही स्पर्श करीत नाहींत. इतकेंच नव्हे तर एखाद्या उदयोन्मुख पंडिताच्या उत्कर्षासाठीं ते आपल्या स्वतःच्या ग्रंथरचनेला तिलांजली देण्यास मागेंपुढें पहात नाहींत.

संतांची साहित्यिक दृष्टि किती सदय असते हें सत्य श्रीचैतन्य प्रभु ऊर्फ निमाई पंडित यांच्या चरित्रांत पहावयास सांपडतें. ज्याप्रमाणें श्रीज्ञानेश्वरांनीं वयाच्या १६ व्या वर्षी ज्ञानेश्वरी ग्रंथ लिहिला त्याचप्रमाणें निमाई पंडितांनीं वयाच्या १७ व्या वर्षी न्यायशास्त्रावर एक प्रबंध लिहिला. नदिया शहर हें त्या काळीं भारतांतील एक प्रसिद्ध विद्यापीठ म्हणून प्रसिद्ध होतें. पूर्वीच्या काळीं भारतांत तक्षशिला किंवा नालंदा ह्या विद्यापीठांचा जो लौकिक होता तशाच प्रकारचा लौकिक निमाई पंडितांच्या काळीं नदिया शहराचा होता. त्यावेळीं तेथें रघुनाथ पंडित नांवाचे अखिल भारतीय कीर्तीचे नैय्यायिक होते. आजही त्यांचे न्यायशास्त्रावरील ग्रंथ अधिकृत असे मानले जातात. ह्या रघुनाथ पंडितांनीं न्यायशास्त्रावर एक नवा प्रबंध लिहिला होता. आपला प्रबंध अगदीं नावीन्यपूर्ण आणि अपूर्व आहे, असा त्यांचा आत्मविश्वास होता. ह्या आत्मविश्वासाच्या आनंदाच्या भरांत असतांना त्यांच्या घरीं निमाई पंडितांची स्वारी उभी राहिली. दोघेहि चांगले स्नेही; दोघेही अध्यापक; एकाचा विषय न्यायशास्त्र तर दुसऱ्याचा विषय व्याकरण. निमाई पंडितांचें वैय्याकरणी म्हणून नांव गाजलेलें होतें. त्यांच्या हातांत एक पुडकें पहतांच रघुनाथ पंडितानें ' हातांत काय आहे ' म्हणून विचारलें. ' मीं न्यायशास्त्रावर एक प्रबंध लिहिला आहे. आपण त्यांतले तज्ज्ञ, तेव्हां तो आपणास वाचून दाखवावा अशी इच्छा आहे,' असें निमाई पंडितांनीं सांगितलें. ह्यावर ' फार उत्तम ' असें म्हणून रघुनाथ पंडितांनीं त्यांच्या खांद्यावर हात ठेवून दोघेहि घराबाहेर पडले. जातां जातां भागीरथीच्या तीरावर येतांच निमाई पंडित म्हणाले, ' आपण

नावेंत बसून प्रबंधवाचन करूं, म्हणजे नौकाविहारही होईल व आपलें कामही होईल.' भागीरथीच्या संथ प्रवाहांत नाव मंदगतीनें जात होती. अस्खलित वाणीनें निमाई पंडित आपल्या न्यायशास्त्रावरील प्रबंधाचें वाचन करीत होते. आपल्या प्रबंधवाचनांत निमाई इतके गढून गेले होते कीं, समोर बसलेल्या रघुनाथ पंडितांच्या चेहऱ्याकडे मधून मधून पहाण्याचें त्यांना भान राहिलें नाहीं. वाचन संपल्यावर 'कसा आहे माझा प्रबंध?' हा प्रश्न विचारण्यासाठीं त्यांनीं रघुनाथ पंडितांच्या तोंडाकडे पाहिलें, तों काय आश्चर्य! रघुनाथ पंडितांच्या डोळ्यांतून खळखळा अश्रुधारा वहात होत्या! आपल्या प्रबंधाचा असा अनपेक्षित परिणाम होईल ही निमाईंना कल्पना नव्हती. त्यांनीं लागलीच 'भाई, आपल्या डोळ्यांतून अश्रू कां वहात आहेत?' असा प्रश्न केला. त्यावर रघुनाथ पंडितांनीं उत्तर दिलें : 'निमाई, तूं सरळ मनाचा आहेस म्हणून तुला माझ्या अंतःकरणांतील गुपित सरळ सरळ सांगतों. मीं स्वतः न्यायशास्त्रावर एक प्रबंध लिहिला आहे. माझा हा ग्रंथ न्यायशास्त्रांतील एक अपूर्व ग्रंथ होणार अशी माझी ह्या क्षणापर्यंत खात्री होती. परंतु तुझा हा प्रबंध ऐकून माझी सपशेल निराशा झाली. तुझ्या प्रबंधापुढें माझा प्रबंध कांहींच नाहीं; हें पाहून मला अतिशय दुःख झालें, हें मी प्रामाणिकपणें तुझ्याजवळ कबूल करतों.' त्यावर निमाई म्हणाले, 'भाई, इतक्या क्षुल्लक गोष्टीबद्दल मनाला एवढा त्रास कां करून घेतां? आपल्या उत्कर्षापुढें माझा प्रबंध ही काय चीज आहे? माझ्या प्रबंधामुळें तुम्हांला जर दुःख होत असेल तर ह्या प्रबंधाची अग्नींत आहुति देण्यासही मी तयार आहें. जें तुमचें सुख तेंच माझें सुख. मुळींच खेद करूं नका. ही पहा एथल्या एथेंच माझ्या प्रबंधाला जलसमाधि देतों.' असें म्हणून निमाईंनीं प्रबंधाचीं सर्व पानें भागीरथींत भिरकावून दिलीं! निमाईची वाङ्मयीन दृष्टि ही संताची विश्वात्मक भावाची दृष्टि होती. ती सदय दृष्टि होती. त्या दृष्टींत चुरशीची हीन कल्पना नव्हती. हें निमाईचें कृत्य पाहून रघुनाथ पंडित दिङ्मूढ होऊन गेले. इतका हा अपूर्व स्वार्थत्याग त्यांच्या कल्पनेबाहेर होता. इतकें परमावधीचें भूतदयेचें उदात्त दृश्य वाङ्मयाच्या इतिहासांत सांपडणें अशक्य आहे. 'तें चालतें ज्ञानाचें बिंब। जयाचे अवयव ते सुखाचे कोंभ' अशा कोटींतील निमाईसारख्या अवतारी पुरुषाच्या कृपामृताचें तें लीलाकुतूहल होतें. असा हा पंडितांना आदर्शवत्, साहित्यिकांना उद्‌बोधक आणि रसिकांना संतोषप्रदायक प्रसंग जागतिक वाङ्मयांत दुसरा सांपडणार नाहीं.

पूर्वींच्या काळीं प्राध्यापक पंडितांचा केवढा रुबाब आणि केवढें वैभव! त्यांतल्या त्यांत एखादा दिग्विजयी पंडित निघाला तर त्या स्वारीचा थाट काय विचारूंच नका. स्वारी हत्तीच्या अंबारींतून घराबाहेर पडावयाची. बरोबर कर्णे, तुताऱ्या यांचे जयघोष चाललेले असावयाचे. ह्याचें कारण त्या काळीं पंडित प्राध्यापकांना राजाश्रय आणि लोकाश्रय भरपूर होता. त्यामुळें अध्ययन, अध्यापन आणि व्यासंग ह्यापलीकडे त्यांना कसलीच चिंता नव्हती. यामुळें आपल्या अंगीकृत विषयांत ते पारंगत असत. इतकेंच नव्हें तर त्या विषयावर स्वतंत्र ग्रंथरचनेची पात्रता त्यांच्या ठायीं होती. हा काळाचा

महिमा आहे. आज त्या विद्यावैभवाच्या काळाची नुसत्या कल्पनेनेंच ओळख करून घेणें भाग आहे. त्या काळीं पंडित प्राध्यापकांना कोणत्याही तऱ्हेची प्रापंचिक चिंता करण्याचें कारण नव्हतें. कारण तो प्रश्न राजाश्रयानें आणि लोकाश्रयानें सोडविला जात असे. ही एक परंपराच चालू होती. रोमच्या प्राचीन इतिहासांत सुद्धां ही परंपरा सांपडते. ह्यालाच रोमन ट्रॅडिशन ( Roman Ttradition ) असें नांव होतें. प्राध्यापक पंडितांना कोणत्याही आर्थिक अडचणीपासून स्वतंत्र ठेवणें ही आर्य-परंपरा आज राहिलेली नाहीं. आज प्राध्यापकांना एक तर भरपूर वेतन मिळत नाहीं. त्यांत मुलांचें शिक्षण, त्यांचें संगोपन, आणि रोजच्या वाढत्या महागाईस तोंड देऊन आपल्या पगारांत खर्चाची तोंडमिळवणी करण्यांतच ते अहोरात्र बेचैन व अस्वस्थ असतात. आज प्रध्यापक नुसता वेठीचा बिगारी झाला आहे. त्यामुळें परीक्षकाची जागा मिळण्यासाठीं धडपड करणें, आणि तें न जमल्यास इतर कांहीं किरकोळ कामें करून जेमतेम आपला प्रपंच चालविण्यांत त्यांचा काळ जात असतो. अशा दीनवाण्या परिस्थितीशीं सतत झगडत असणाऱ्या आमच्या प्राध्यापकांकडून स्वतंत्र ग्रंथनिर्मितीची अपेक्षा करणें म्हणजे सहारा वाळवंटांत हापूसच्या आंब्याची लागावड होण्याची अपेक्षा करण्यासारखें आहे. तरीसुद्धां आश्चर्याची गोष्ट ही कीं अशी विलक्षण अपेक्षा करणारे प्राणी खुद्द प्राध्यापक वर्गांतच कांहीं सांपडतात.

निमाई पंडितांच्या काळीं नदिया शहराचें नांव आणि त्याचा विद्यालौकिक अखिल भारतांत दुमदुमत होता हें वर सांगितलेलेंच आहे. काश्मीरचे केशवशास्त्री पंडित यांनीं आपल्या पांडित्याच्या प्रभावानें शेकडों गांवांच्या पंडितांना वादांत जिंकिलें होतें. यामुळें लोक त्यांस 'दिग्विजयी' पंडित असें म्हणत असत. हे दिग्विजयी पंडित नदिया गांवांत येऊन थडकले. इतकेंच नव्हे तर: खुद्द नदियांतसुद्धां एक दोन पंडितांना वादांत त्यांनीं नामोहरम केलें. निमाई पंडितांच्या कानावर जेव्हां ही गोष्ट गेली तेव्हां त्यांना फार वाईट वाटलें. ते जरी पंडित असले तरी अंतर्बाह्य संतवृत्तीचे होते. दिग्विजयी पंडितांची ही परमार्थाच्या दृष्टीनें अध:पतनास नेणारी लौकिकेषणा पाहून त्यांचें संतहृदय द्रवलें. ह्या लेखाच्या शिरोभागीं 'कोठेंही जा, संताची रहाणी कांहीं सारखी नसते,' अशा अर्थाचें सांई-सच्चरित्रांतील अवतरण दिलें आहे. परंतु संतांची रहाणी जरी सारखी नसली तरी त्यांची शिकवण ही सारखीच असते. 'वादावादी नाहीं बरी, नको कुणाची बरोबरी ' हा श्री साईबाबांचा उपदेश काय किंवा 'लौकिकेषणा ही परमार्थांत अत्यंत घातक आहे,' हा निमाई पंडितांचा उपदेश काय ह्या दोहोंत तत्त्वतः पाहिलें असतां कांहींही फरक नाहीं. लौकिकेषणेपासून दूर रहा हा इषारा निमाई पंडितांस काश्मीराहून आपल्या मशालीं उजळीत आलेल्या दिग्विजयी पंडितांना द्यावयाचा होता.

ह्या जगांत शेरास सव्वाशेर हा ठेवलेलाच आहे. कोणत्याही क्षेत्रांत घ्या, विद्येंत काय किंवा खेळांत काय, निरंतर अजिंक्य–पत्र कोणासच मिळालेलें नाहीं. कालचा

अजिंक्य गडी उद्यांच्या स्पर्धेत पराभूत होतो. ह्या अजिंक्यपणाच्या लौकिकेषणेचें पराभूतेंतत केव्हांतरी पर्यवसान होतेंच होतें. आणि मग ना धड स्वार्थ ना धड परार्थ अशी त्या माणसाची विटंबना होऊन त्याच स्थितींत तो तडफडत असतो. अशा दीनवाण्या स्थितीपासून दिग्विजयी पंडितांचें संरक्षण करावें ही तीव्र भावना निमाई पंडितांच्या संत हृदयांत घोळूं लागली. परंतु भर सभेंत दिग्विजयी पंडिताचा पराभव करणें त्यांच्या संत हृदयास रुचलें नाहीं. ह्यावर त्यांनीं एक नामी तोड काढिली, आणि ती अमलांत आणण्याच्या तयारीस ते लागले.

सुदैवानें त्यांना लवकरच अनुकूल अशी परिस्थिति लाभली. सायंकाळीं भागीरथीच्या तीरावर अध्यापक व त्यांचे शिष्य असे अधून मधून बसलेले असावयाचे. तेथें आप-आपसांत आपआपल्या विषयावर त्यांच्या गप्पा चालावयाच्या. दिग्विजयी पंडित हे एकटेच रोज सायंकाळीं तीरावर बसावयाचे. त्यांना पहातांच कांहीं विद्यार्थी सुद्धां त्यांच्या ज्ञानाचा लाभ घेण्यास त्यांच्याभोंवतीं मोठ्या कौतुकानें गोळा व्हावयाचे. निमाई पंडित एके दिवशीं आपल्या कांहीं शिष्यांना घेऊन दिग्विजयी पंडितांच्या रोजच्या बसण्याच्या ठिकाणीं गेले. सर्वांनीं आदरपूर्वक त्यांना अभिवादन करून त्यांच्याभोंवती ते बसले. दिग्विजयी पंडित हे शरीरानें थोडे स्थूल होते, परंतु त्यांची शरीरयष्टि भव्य होती. त्यांचे डोळे टपोरे आणि तेजस्वी होते. पहाणाराच्या मनांत आदर उत्पन्न होईल असा त्यांचा चेहेरा होता. निमाई पंडित व त्यांचे शिष्य हे गप्प बसले होते. त्यांना गप्प बसलेले पाहून दिग्विजयी म्हणाले, 'काय, तुम्ही गप्प कां बसलांत?' त्यावर क्षणभर कोणी कांहींच उत्तर दिलें नाहीं. सर्व विद्यार्थी एकमेकांच्या तोंडाकडे पहात राहिले अंमळशानें. पुन्हां दिग्विजयी पंडितांनीं निमाईकडे पाहून विचारलें, 'तुम्ही कुठल्या पाठशाळेंत शिकतां?' ह्यावर एका विद्यार्थ्यानें सांगितलें, 'हे आमचे प्रख्यात अध्यापक निमाई पंडित.' त्यावर दिग्विजयी जरा चमकून म्हणाले, 'अरे वा! निमाई पंडित ते आपणच का? आपण मोठे वैय्याकरणी आहांत अशी आपली कीर्ति ऐकिलेली आहे. आपल्या व्याकरणशास्त्राच्या ज्ञानाचा आम्हांला तरी थोडा लाभ द्या ना.' निमाई मोठ्या विनयानें म्हणाले, 'मी जे कांहीं थोडें थोडें शिकलों आहें तो आपल्यासारख्या महान् गुरुवर्यांचा प्रसादच आहे. आपण तर आपल्या विद्यावैभवानें सर्व संसार विजयश्रीनें भरून टाकलेला आहे. आपल्या अनुपम काव्यशक्तीची आम्हीं फार फार प्रशंसा ऐकिली आहे. कृपा करून आपल्या अमृततुल्य काव्याचा आस्वाद आम्हांला द्यावा अशी विनंति आहे. मात्र आपल्या काव्याच्या द्वारें आम्हांला नितांत भगवत् प्रेमाचें सुख लाभेल असें आपलें काव्य ऐकण्यास आम्ही आतुर आहोंत.' ह्या निमाईच्या भाषणानें खुष होऊन दिग्विजयी पंडितांनीं म्हटलें, 'तर मग ह्या पवित्र व पावन करणाऱ्या गंगामाईवरच मी आपणांला काव्य ऐकवून दाखवितों!'

दिग्विजयी पंडित हे शीघ्र कवि होते, परंतु त्यांची शीघ्र कविताही प्रतिभापूर्ण आणि पदलालित्यादि अलंकारांनीं भरपूर शृंगारलेली असे. त्यांनीं भराभर एकामागून

एक असे श्लोक म्हणण्यास सुरवात केली. एकापेक्षां एक सरस असे त्यांचे श्लोक ऐकून रसिक श्रोत्यांना अत्यंत आनंद झाला. दिग्विजयींच्या कविता ऐकून प्रत्येकाच्या मुद्रेवर आश्चर्य व धन्यता दिसूं लागली. जणूं काय त्यांच्या शीघ्र काव्याच्या गतीपुढें गंगेची गति क्षणभर कुंठित होऊन हें कौतुक पहात आहे असें वाटावयास लागलें. आपल्या काव्याची श्रोत्यांच्या मनावर चांगलीच छाप पडली, ही गोष्ट दिग्विजयी पंडितांच्याहि सहज लक्षांत आली; ह्यामुळें जास्तच स्फुरण चढून ते अत्यंत आनंदानें भरभरा पुढें श्लोक म्हणूं लागले. श्रोते जास्त जास्त डोलूं लागले. तो सोहळा काय वर्णावा! तें कांहीं रेडिओवरील कविसंमेलन नव्हतें. रेडिओवरील कविसंमेलनांत प्रत्येक कवीला आपल्या छोट्याशा कवितेचा चरण दोन वेळां ठांसून प्रत्येक शब्दावर जोर देऊन बोलण्याची आवश्यकता भासते. तसा कांहीं प्रकार इथें नव्हता. दिग्विजयी पंडितांची कवित्वशक्ती जितकी शीघ्र होती तितकाच वाणीचा प्रभाव अस्खलित आणि जलद होता. 'तेथे सुगरणी आणि उदारे। रसज्ञ आणि जेवणारे। मिळतां लागो अवतरे। हात जैसा' या श्रीज्ञानेश्वरांनीं वर्णिलेल्या थाटाचा तो बहारीचा प्रसंग होता. आपलें काव्य संपल्याबरोबर दिग्विजयी पंडित कृतकृत्यतापूर्वक मोठ्या दिमाखानें श्रोत्यांकडे पाहूं लागले. श्रोतेसुद्धां स्तिमित मुद्रेनें स्तब्ध बसले होते. ह्या स्तब्धतेचा भंग हळूच निमाई पंडितांनीं केला. ते म्हणाले, 'महाराज, इतकें सुंदर काव्य आम्हीं आजपर्यंत ऐकिलें नव्हतें. इतकेंच काय, पण आपल्यासारखा थोर कवि आम्हीं आजपर्यंत पाहिला नव्हता. आतां आपणाला इतकीच नम्र विनंति आहे कीं, या काव्यांतील एखादा श्लोक घेऊन त्यांतील अर्थसौंदर्य आणि गुणदोष आम्हांला समजावून सांगावे.' 'दोष' हा शब्द ऐकल्यावर ते म्हणाले, 'केशव पंडितांच्या काव्यांत तुम्हांला दोष औषधाला सुद्धां मिळणार नाहींत.' दिग्विजयी पंडितांचें नांव केशव असें होतें हें वर सांगितलेलें आहे. दिग्विजयींनीं मनांत असा विचार केला कीं माझें काव्य नवीन आहे, श्लोक संख्याच शंभरावर आहे आणि तें मीं जलदीनें म्हणून दाखविलें आहे. अर्थात् त्यांतले गुणदोष कळण्याचा अवसर श्रोत्यांना मुळींच नाहीं; अशा परिस्थितींत माझ्या काव्यांतील एखादा श्लोक घेऊन त्यांतील गुणदोष दाखविणें ही गोष्ट अशक्य कोटींतील आहे. निमाई पंडितांनीं अत्यंत विनयानें म्हटलें, 'महाराज, आपल्या कृपेनें माझी अवधान शक्तिसुद्धां परिपूर्ण आहे' असें म्हणून त्यांनीं

**महत्त्वं गंगायाः सततमिदमाभाति नितरां**<br>
**यदेषा श्रीविष्णोश्चरणकमलोत्पत्तिसुभगा।**<br>
**द्वितीय-श्रीलक्ष्मीरिव सुरनरैरर्च्यचरणा**<br>
**भवानीभर्तुर्या शिरसि विभवत्यद्भुतगुणा॥**

—केशव काश्मीरी पंडितस्य

**भावार्थः** ह्या गंगादेवीचें महत्त्व सर्वदा दैदीप्यमान आहे. कारण कीं हिची उत्पत्ति भगवान् श्रीविष्णूच्या चरणकमलापासून झालेली असल्यानें जणू काय दुसरी लक्ष्मीच म्हणूच तिच्या चरणाची सुरनर पूजा करितात. देवी भवानीचा स्वामी जो महादेव ( शंकर ) त्याच्या शिरावरून प्रवाहित झालेली ही अद्भुतगुणसंपन्न आहे.

वरील श्लोक निमाई पंडितांनीं म्हटल्याबरोबर दिग्विजयी आश्चर्यचकित झाले. त्यांचें तोंड फिकें पडलें. इतक्यांत निमाई पंडितांनीं ह्या श्लोकाचें सौंदर्य व गुणदोष सांगण्यास दिग्विजयींना विनंती केली. दिग्विजयीनीं लटकें हास्य आणून म्हटलें, 'आपण फार हुशार दिसतां. मीं इतक्या जलदीनें काव्य म्हटलें तरी सुद्धां आपण त्यांतला एक श्लोक मुखोद्गत केलांत, ही नवलाची गोष्ट आहे.' 'हा सारा आपल्या कृपेचा प्रभाव आहे,' असें निमाई पंडित नम्रतेनें म्हणाले. आपली बाजू सांवरण्यासाठीं म्हणून दिग्विजयी उद्गारले, 'हा अलंकारशास्त्राचा विषय आहे. तुम्हीं तर वैय्याकरणी आहांत. ह्यांत तुम्हांला काय समजणार ?' 'महाराज, अलंकारशास्त्राचें मीं अध्ययन केलेलें नाहीं. त्यांतील कांहीं माहिती माझ्या कानावरून गेली आहे इतकेंच. परंतु माझ्याबरोबर एथें कांहीं अलंकारशास्त्राचे पंडित व विद्यार्थी बसलेले आहेत, त्यांना तरी त्यामुळें आनंद होईल.' निमाईचें हें भाषण ऐकून दिग्विजयींनीं त्या श्लोकाचें पदलालित्य, लाटानुप्रास, अलंकारादि असें त्या श्लोकांतील सौंदर्य दाखवून दिग्विजयी गप्प बसले. ह्यावर निमाई जरा पुढें होऊन म्हणाले, 'महाराज, आपणांला जर ह्यांत कांहीं अनुचित वाटणार नाहीं तर मी सुद्धां ह्या श्लोकांतील गुणदोष दाखविण्याचा प्रयत्न करतों.' निमाईचे हे शब्द ऐकतांच सर्पाच्या शेपटीवर जसा पाय पडावा तशी दिग्विजयी पंडितांची स्थिति झाली. मी एवढा दिग्विजयी कवि, आणि निमाईसारखा कालचा पोर माझ्या काव्यांतील गुणदोष दाखविण्याचा उर्मटपणा करीत आहे. आणखी याला जरी एखादा श्लोक लगेच मुखोद्गत झाला असला तरी चटकन् ताबडतोब त्या श्लोकांचें परीक्षण करून त्यांतील गुणदोष दाखविणें ही अशक्य कोटींतीलच गोष्ट आहे. या आत्मविश्वासाच्या भरांत आपला क्रोधावेश आवरून लटकें स्मित करून ते म्हणाले,' बरें तर, माझ्या श्लोकांत काय गुणदोष आहेत ते आपण दाखवा.' ह्यावर निमाई आर्जवानें म्हणाले, 'श्लोक अत्यंत सुंदर आहे. गुणदोष जर काढीत बसले तर ह्यांत बरेच गुणदोष आढळतील. ह्याच्यांत पांच मुख्य गुण आहेत व पांच ढोबळ दोष आहेत.' हें ऐकतांच आवेशानें आपलें डोकें हालवित दिग्विजयी म्हणाले, 'दाखवा ना कोणकोणते दोष आहेत ते.' निमाईनें सरळपणें म्हटलें, 'आधीं गुण ऐका.' व त्याप्रमाणें त्यांनीं वर दिलेल्या श्लोकांतील गुण सांगण्यास सुरवात केली. (१) पहिला गुण, ह्या श्लोकांत शब्दालंकार चांगले साधले आहेत. (२) दुसरा गुण **"पुनरुक्तिवदाभास"** हा होय. अलंकारशास्त्रांत दोन समान अर्थांचे शब्द एका पदांत आल्यास त्यांत पुनरुक्ति आहे असें वाटतें, परंतु खरोखर ती पुनरुक्ति नसते. आपल्या श्लोकांत **'श्री-लक्ष्मीः** इव ' हें पद आलें आहे. यामुळें **'श्री** व **लक्ष्मी** ' ह्या दोन शब्दाची पुनरुक्ति झाली आहे असें वाटतें. पण

श्रीनें युक्त अशी **लक्ष्मी** असा अर्थ घेतल्यास अर्थसौंदर्यांत भर पडून पुनरुक्तिवदाभास हा गुण उठावून दिसून येतो. ( ३ ) तिसरा गुण 'अर्थालंकार' हा होय, **लक्ष्मीः व** ह्या पदानें गंगेला लक्ष्मीची उपमा देऊन सुंदर अर्थालंकार साधला आहे. ( ४ ) चवथा गुण **विरोधाभासार्थलंकार**–हा चांगला साधला आहे. उपमा आणि उपमेय यांच्या भिन्न भिन्न गुणामुळें जो अर्थ साधला जातो व त्यामुळें विरोधाचा आभास होतो त्याला **विरोधाभासालंकार** म्हणतात. आपल्या श्लोकांतील '**विष्णोश्चरणकमलोत्पत्तिसुभगा**' या पदानें हा अलंकार आपण सुंदरपणें दाखविला आहे. विष्णूच्या चरणांना कमलाची उपमा दिली आहे. कमलाची उत्पत्ति पाण्यापासून होते. पण पाण्याची उत्पत्ति कांहीं कमळापासून होत नाहीं. इथें गंगा ( अर्थात् जलमय ) ही विष्णूच्या चरणकमलापासून झालेली आहे. हा विरोधालंकार आहे. ( ५ ) पांचवा गुण '**अनुमान,** अलंकार हा होय. श्लोकाचें साध्य 'गंगेचें महत्त्व' हें आहे. आणि त्याचें साधन 'विष्णूच्या पदापासून उत्पत्ति' हें आहे. श्लोकांतील '**विष्णोश्चरणकमलोत्पत्ति** ह्या पदानें 'अनुमान' अलंकार चांगलाच साधला आहे.

आपल्या श्लोकांतील हे पांच गुण ऐकून दिग्विजयी पंडित खुष होण्याऐवजीं मनांतल्या मनांत जास्तच संतापले. त्या संतापाच्या आवेशांतच ते म्हणाले, 'बरें बरें, आतां त्यांत दोष काय आहेत ते दाखवा.' त्यावर निमाई पंडित म्हणाले, 'महाराज, आपल्या श्लोकांत दोन ठिकाणीं '**अविमृष्ट–विधेयांश**' हे दोन दोष आहेत. तिसरा '**विरुद्धमति**' हा दोष आहे. चवथा '**भग्नक्रम**' व पांचवा '**पुनरुक्ति**' असे दोष आहेत. साहित्यशास्त्राच्या नियमाप्रमाणें आपल्या श्लोकांत हे असे पांच ढोबळ दोष आहेत. '**महत्त्वं गंगायाः**' ह्या पदांत गंगेचें महत्त्व हा मुख्य विषय किंवा विधेय आहे. आपण '**महत्त्वं गंगायाः**' या पदानंतर '**इदं**' म्हणजे '**हें**' हें सर्वनाम अनुवादांत घेतलें आहे. अर्थात '**इदं**' हा अनुवाद प्रथम न करितां '**महत्त्वं गंगायाः**' हें पद आधीं घेऊन '**अविमृष्ट–विधेयांश**' हा दोष केलेला आहे. कारण ह्यांत विधेयानंतर अनुवाद घेतलेला आहे, हें उघड आहे. अशाच तऱ्हेचा दुसरा दोष '**द्वितीयश्रीलक्ष्मीः**' ह्या पदांत झालेला आहे. 'द्वितीयत्व हें आपलें विधेय आहे. पण हा शब्द '**द्वितीयश्रीलक्ष्मी**' ह्या समासांत पडल्यामुळें तो मुख्य न रहातां गौण ठरला आहे. अर्थात् ह्यामुळें उघड उघड अर्थहानि झाली आहे. तिसरा '**विरुद्धमति**' हा दोष श्लोकाच्या ४ थ्या चरणांतील '**भवानीभर्ता**' या पदांत उघडपण दिसून येतो. ( भवस्य पत्नी भवानी ) भव = शंकर, त्याला 'नी' हा स्त्रीलिंगी प्रत्यय लागला त्यामुळें 'भवाची पत्नी' ती भवानी असा अर्थ होत आहे. आपण तर 'भवानीभर्ता' असें म्हटलें आहे. ह्याचा अर्थ 'शंकराच्या पत्नीचा भर्ता' असा होतो. ह्यामुळें शंकराचा बोध न होतां दुसऱ्या कोणत्यातरी पतीचा बोध होतो. असा हा मोठा '**विरुद्धमति**' दोष आपल्या श्लोकांत आहे. चवथा '**पुनरुक्ति**' दोष श्लोकांत प्रामुख्यानें आढळतो. श्लोकाच्या ४ थ्या चरणांतील '**विभवति**' या

पदानें आपण गंगेचें वर्णन संपूर्ण केलेलें आहे. या नंतर '**अद्भुतगुणा**' हें विशेषण देऊन '**पुनरुक्ति**' दोष झालेला आहे. पांचवा मुख्य दोष '**भग्नक्रम**' हा आहे. आपल्या श्लोकांतील पहिल्या, तिसऱ्या व चवथ्या चरणांत अनुप्रासांचा क्रम मुद्दाम ध्वनित केला आहे. परंतु दुसरा चरण अनुप्रासरहित आहे. यालाच 'भग्नक्रम' असें म्हणतात.' ही निमाई पंडिताची टीका ऐकून दिग्विजयी यांचें तोंड काळवंडून गेलें !

★

दिग्विजयी पंडितांना मरणप्राय दुःख झालें. त्यांच्या अंगाची लाही लाही झाली. नामदेवाच्या डोकीवर गोरा कुंभारानें थापटणें आपटल्यावर तो जसा अपमानानें व्यथित होऊन पांडुरंगाकडे गाऱ्हाणें घेऊन गेला, त्याचप्रमाणें दिग्विजयी पंडित आपल्या घरीं जाऊन आपल्या पूजेंतील सरस्वतीच्या मूर्तीपुढें बसले. दिग्विजयी हे सरस्वतीचे कट्टे भक्त होते. सरस्वतीची आराधना करून तिच्याकडून त्यांनी वर मागून घेतले होते. असें असतांना हा पराभव कां झाला, याबद्दल देवीजवळ त्यांनीं गाऱ्हाणें घातलें, व तशा स्थितींत ते तेथेंच झोंपी गेले. झोपेंत असतां त्यांना स्वप्नांत देवीनें दृष्टांत दिला कीं, 'लौकिकैषणा जास्त वाढवूं नकोस. निमाई हा साक्षात् भगवंताचा अवतार आहे. त्याला सर्वस्वीं शरण जाण्यांतच तुझें कल्याण आहे. तुला जास्त अभिमान झाला होता, व ह्या अभिमानामुळें तुझें लवकरच पतन होण्याचा संभव होता म्हणूनच तुझी व निमाई पंडितांची भेट मी करून दिली.' ह्या दृष्टांताप्रमाणें तो दुसऱ्या दिवशीं निमाई पंडितांस शरण गेला, आणि निमाईनीं त्यांना निःश्रेयसाचें वरदान दिलें.

वरील प्रसंगांत उदात्त असें काय आहे अशी कोणी शंका घेईल. निमाईनें जर मनांत आणिलें असतें तर भर सभेंत दिग्विजयी यांचा पराजय करून सहज दाखविला असता. परंतु तसें न करितां खाजगी बैठकींत त्यांना गांठून, 'बाबारे, या जगांत शेरास सव्वाशेर ठेवलेलाच आहे. कालचा जेता हा उद्यांचा जित हा परमेश्वराचा न्याय आहे. विषेशतः वेदांताच्या शास्त्राचें अध्ययन करणारांना हें कळूं नये ही खेदाची गोष्ट आहे. पुत्रेषणा किंवा वित्तेषणा वेळीं सोपी आहेत. परंतु लौकिकैषणा हा मोठाच दुर्दम्य मोह आहे. विशेषतः वेदान्तशास्त्राचे व पारमार्थिक ज्ञानाचे आपणास जे उपासक म्हणवितात त्यांनीं लौकिकैषणेपासून दूर राहिलें पाहिजे. ज्यांना हें साधलें नाहीं त्यांनीं सामान्य लोकांस निःश्रेयसाच्या मार्गावर नेण्याचें कार्य प्रवचनादि द्वारें करणें म्हणजे अंधानें मार्गदर्शकाचें काम करण्यासारखें आहे.




[ कवि — श्रीपाद ]

## ईशस्तवन

नमूं आधिं श्री सत्यविनायका रे। करो कार्य निर्विघ्न जो सत्वरें रे ॥
करी शीत छाया स्वदासांसि जो रे। श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १ ॥
नमूं श्रीगणेशा सुखदायका रे। झणीं बुद्धि धैर्यादि जो देइ बा रे ॥
मती उजळी जो स्वदासांचिये रे। श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ २ ॥
तई वंदुं श्रीशारदेसी मुदें रे। स्ववत्सासि जे पोसि सद्भावनें रे ॥
सदा सन्मती देई, चातुर्य जी रे। श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ३ ॥
नमस्कार माझा तुम्हां सद्गुरो रे। जनीं या जिवा लाविलें सत्पथा रे ॥
तिमीरासि वारूनि दे ज्ञान जो रे। श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ४ ॥
नमस्कार श्रीत्र्यंबकातें मुदें रे। जयें ईशसेवा–पथ दाविला रे ॥
मती श्रीगणेशा पदी जोडिली रे। श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ५ ॥
नमूं सद्गुरू मार्गदीपा सदा रे। दयावंत जो जाहला सत्वरें रे ॥
मुनी साधुपंथे जना नेतसे रे। श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ६ ॥
नमूं संतश्रोते तुम्हां आदरें रे। हृदीं धर्मश्रद्धा वसे हो सदा रे ॥
सदा अंतरीं ध्येयही थोर हो रे। श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ७ ॥

## संतवंदन

नमूं साइनाथा कृपासागरा रे। नमूं सिद्धश्रेष्ठा, दयावंत हो रे ॥
तुझी पुण्यतीथी उजवूं इथें रे। श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ८ ॥
नमस्कार श्रीसाइनाथा पुन्हां रे। तुझ्या दिव्य मूर्तीस मी वंदितों रे ॥
तुझी कीर्ति गाया मज स्फूर्ति दे रे। श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ९ ॥
जसे वर्तती थोर थोरादि सारे। तसे अन्यही वर्तती लोक बा रे ॥
प्रभू कृष्णजी बोलती बोल हे रे। श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १० ॥
विभूती प्रभूच्या असती बहू रे। बहू जाहल्या, होतिही कैक बा रे ॥
तयां सेवितां, ईश राजी असे रे। श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ११ ॥

विभूती प्रभूच्या बहू रम्य होरे । प्रती विश्वमूर्तीच त्या भासती रे ॥
प्रतापें अखंडीत त्या नांदती रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १२ ॥

## विभूती

जयें लोककल्याण केलें बहू रे । जनाकारणें कष्टही सोसिले रे ॥
वसे अंतरीं थोर दातृत्व ज्यां रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १३ ॥
गुणातीत जे होउनी राहिले रे । विकारांसि जे ठेविती दूर बा रे ॥
सदा सद्विचारें जगीं वर्तती रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १४ ॥
दयावंत जे होति सर्वज्ञही रे । जिवांकारणें जीव उचंबळे रे ॥
तिमीरासि ज्ञानेंहि जे वारिती रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १५ ॥
न जे पाहती वासुदेवाविना रे । जगीं श्रीहरी एकची होय वा रे ॥
न 'मी, तूं' असा भेद ज्यातें शिवे रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १६ ॥
जयां पाहतां जीव प्रसन्न हो रे । जयें दीन जीवांसि गा ! तारिलें रे ॥
सदा मग्न ध्यानीं, शिवा चिंतिती रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १७ ॥
नसे स्वार्थ कांहीं परार्थाविना रे । नसे लोभ वा क्रोध कदा मनीं रे ॥
सदानंद सेवीत हे संत बा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १८ ॥
विभूती प्रभूच्या जगीं जाहल्या रे । तयें शोभली आर्यभू हे खरी रे ।
सुखें कीर्ति गातां, जिवीं शांति ये रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १९ ॥
सदा आदरें संतपदां स्तवूं रे । तयांची सदा नाममाला जपूं रे ॥
करा जोडुनी तत्पदांतें नमूं रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ २० ॥
प्रभूवांचुनी अन्य ना काम ज्यां रे । प्रभू सर्वभूतींच तो नांदतो रे ॥
प्रभूचीच हे सर्व लीला असे रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ २१ ॥
जईं धर्मग्लानी घडे या जनीं रे । जईं साधुंतें पीडिती दुष्ट ते रे ॥
तईं श्रीहरी घेतसे जन्म बा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ २२ ॥
जईं भावना भ्रष्ट होती जनीं रे । जईं तूटती बंध धर्मांचिये रे ॥
तईं या विभूती जगीं जन्मती रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ २३ ॥
अहंकार अज्ञान जैं वाढती रे । दया वा क्षमा ते नुरे अंतरीं रे ॥
सदा क्रोध वा दंभ जैं वाढतीं रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ २४ ॥
मदें मातती दुष्ट जैं या जनीं रे । तसा स्तोम तो दंभ घाली जवें रे ॥
तईं रे, तईं संत हे जन्मती रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ २५ ॥
विभूती प्रभूच्या बहू गोड हो रे । सदा लोककल्याण ते पाहती रे ॥
जईं अज्ञता हे नुरे या जिवीं रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ २६ ॥

## संतांची शिकवण

प्रभूचिंतनीं लाविती या जना रे । प्रभू-प्रेम तें दावितीही तसें रे ॥
नुरे अन्य त्राता प्रभूवीण तो रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ २७ ॥

हृदीं जागृती ते जना देतिही रे । असे कोण, कोठून आलों जनीं रे ॥
असें ध्येय तें काय, दावीत बा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ २८ ॥
खरें हीत तें काय, लाभे कसें रे । कुणा कारणें जन्म हा जाहला रे ॥
असे प्रश्न मोठे पुढें मांडती रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ २९ ॥
असे जीव तो काय, परेश तो रे । कुठें राहि तो, प्राप्त होई कसा रे ॥
महागूढ जें तें जना दाविती रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ३० ॥
असे कोण माया, कशी दूर हो रे । अनासक्ति ते या जिवीं ये कशी रे ॥
कसें दूर व्हावें विकारांतुनी रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ३१ ॥
कसें या मनातें दृढ ठेविजे रे । कसें चित्त एकाग्र तें राहिं गा रे ॥
कशी स्थीर बुद्धी करावी तरी रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ३२ ॥
असे काय ठेवा खरा आपुला रे । सवें काय येईल तें पाहिजे रे ॥
कधीं शाश्वती या जिवाची नसे रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ३३ ॥
नका काळ हा घालवूं व्यर्थ बा रे । अतांची घडी ते पुन्हां येत ना रे ॥
करा हीत तें आपुलें कांहीं बा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ३४ ॥
असा बोध हा संत देती जना रे । पुढें लक्षचौऱ्यांशि त्या चूकती रे ॥
किती जन्मफेरे पहा जाहले रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ३५ ॥
पहा देवमूर्तीच हे संत हो रे । उणें कांहीं त्यांच्या नसे गांविं तें रे ॥
सदा वर्षती प्रेम आबाधही रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ३६ ॥
सदा देति ते या जना बोध बा रे । नसे अन्य तो कांहिं व्यवसाय त्यां रे ॥
निजानंदि विश्राम घेती सुखें रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ३७ ॥
पदीं येति जे लीन होऊन बा रे । तयांते झणीं मार्गही दाविती रे ॥
उणें कांहिंना पाहतां संत हे रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ३८ ॥
जिवीं धैर्य घालूनि दासांचिये रे । तयां शांतिचा लाभ देती त्वरें रे ॥
हृदी थोर वात्सल्य संतांसि बा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ३९ ॥
पदाब्जीं प्रभूच्या जिव ओढिती रे । हरी-प्रेम माया जना दाविती रे ॥
सुशांती तयां अक्षयीं देति ते रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ४० ॥
नसे रे नसे अन्य प्रेमाविना रे । सदा सर्वभूतीं सम पाहती रे ॥
दृढा भक्ति ही मानवांची तई रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ४१ ॥
असे जन्म ज्यांचा जनाकारणें रे । तिमिरांधकारा करणें दुरी रे ॥
हृदीं ज्ञानज्योतीच ते लाविती रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ४२ ॥
विभूती अशा जाहल्या भूवरीं रे । सदा देह जे कष्टवीती बहू रे ॥
तयां थोर आत्म्यांस वंदू मुदें रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ४३
नमूं संत जे जाहले दिव्य बा रे । जनातें जयें भक्तितें लाविलें रे ॥
हृदीं थोर श्रद्धा जयें स्थापिली रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ४४ ॥

## साईजन्म

नमूं साइनाथांसि अत्यादरें रे । अजीं पुण्यतीथी उजवूं मुदें रे ॥
कृपा त्यांचि भाकूं गुणां गावया रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ४५ ॥
कुठें जन्म झाला कळेना कुणा रे । पहावें न तें मूळ संताचिये रे ॥
परी वाढ मोठी, तशी कीर्ति ते रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ४६ ॥
कसा वृक्ष अश्वत्थ हा वाढला रे । किती उर्ध्व मूळें तयाचीं पहा रे ॥
किती थोर विस्तार, शाखा तशा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ४७ ॥
किती काळ तो लोटला आश्रमीं रे । कुठें तात वा माउली होति तें रे ॥
कसें कोठुनी त्यांसि वैराग्य ये रे ! श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ४८ ॥
परी थोर योगीच होते खरे रे । जना दाविला मार्ग तो ऊर्ध्व बा रे ॥
प्रभू भक्तिची लालसा उद्भवे रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ४९ ॥

## जन्मभूमी

न जाणे कुणी पुण्यदायी स्थळा रे । जिथें जन्म झाला असे योगिया रे ॥
किती धन्य मातापिता होति ते रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ५० ॥
कुणी बोलती साइ फकीर हो रे । कुणी मानिती पुण्य योगी खरा रे ॥
त्रिकाळज्ञ हो, आत्मज्ञानीच बा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ५१ ॥
जिथें शुद्ध चैतन्य नांदें खुलें रे । जिथें कामक्रोधासि थारा नसे रे ॥
जिथें लोभ ना वास करी मुळीं रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ५२ ॥
जिथें अल्प आसक्ति ना राहिली रे । जिथें मोह दंभासि ठाणें नसे रे ॥
जिथें एक तो भाव ईशावरी रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ५३ ॥
जिथें साम्यता सर्वभूतीं वसे रे । असे हिंदु तो वा अहिंदू असो रे ॥
प्रभूच्या गृहीं मान्यता त्या जिवा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ५४ ॥
जया श्रीप्रभूच्या पदीं भाव हो रे । प्रभूवीण ना अन्यही कामना रे ॥
प्रभुप्राप्ति हें ध्येय जन्मांतरीं रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ५५ ॥
जगीं ज्ञेय तें एक हो श्रीहरी रे । जये जाणिलें सत्य ज्ञानीच तो रे ॥
असारे पसारेच ते अन्य सारे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ५६ ॥
खरें योगि ते जाणती तत्त्व हें रे । असो हिंदु तो वा अहिंदूहि तो रे ॥
नमूं मस्तका या विभूतीस बा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ५७ ॥
असे देहिं आसक्ति जैं या जिवा रे । तईं बोलती हिंदु, खिस्ती जनीं रे ॥
तईं भेद ते होति अलोट बा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ५८ ॥
यहूदी, तसे पारसी, जैन ते रे । मुसलीम होती असे भेद सारे ॥
वपूकारणीं यातना या जनीं रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ५९ ॥

परी देहि तो देहधारी असे रे । असंख्यात रूपें तयाचीं पहा रे
जिवां कर्मयोगें जनीं जन्म हो रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ६० ॥
म्हणोनी वदे श्रीतुकया असें रे । पहावें न तें मूळ संताचिये रे ॥
न जाणे कुणी कर्मगती कशी रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ६१ ॥
मिळे ज्ञान अध्यात्म ज्यांपासुनी रे । गुरूठायिं ते पूज्य होती जना रे ॥
तयां सेवितां ईशपूजा घडे रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ६२ ॥
धरोनी मनीं दृढ ही भावना रे । स्मरा सत्पदां सांइनाथाचिया रे ॥
भवातें क्षणीं जाल तरोनिया रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ६३ ॥

## श्रीसाईरूप

चिराटी शिरीं शुभ्र ती एक हो रे । फकीरापरी वस्त्र ते नेसती रे ॥
धुनी नित्य संनीध ते चेतली रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ६४ ॥
किती तेज तें नेत्रिं हो ओतलें रे । किती सूक्ष्मही पाहती ते जिवां रे ॥
सदा सांगती गूढ जीवांचिये रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ६५ ॥
विचारांसि ते अंतरींच्या क्षणीं रे । जिवांतें कथीतीहि अचूक सारे ॥
चमत्कार नाना जनां दाविले रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ६६ ॥
किती थोर गंभीर मुद्रा असे रे । जणूं विश्व तें एकही पाहती रे ॥
नसे विश्वकर्त्याविना कायही रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ६७ ॥
जई नेत्र ते होति संलग्न बा रे । तई भक्तही खोंचती अंतरीं रे ॥
त्रिकालज्ञ हे योगि त्यां भासती रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ६८ ॥
हृदींचाच ठेवा करीं देति ते रे । तई भक्त ते शांतिही पावती रे ॥
असो चोर वा साधु असाधु ते रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ६९ ॥
किती आत्मसामर्थ्य यांचें पहा रे । पुढें काय होईल तें सांगती रे ॥
लिलेनें जणूं विश्व हें पाहती रे ॥ श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ७० ॥
किती आत्मज्योती हृदीं चेतली रे । असो हिंदु मुस्लीम सम पाहती रे ॥
सदा लोककल्याण हे चिंतिती रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ७१ ॥
जना वाटती सत्य पिशाच्च हे रे । जसे फीरती मूर्ख वेडे जनीं रे ॥
परी अंतरीं दक्षता, ज्ञान हो रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ७२ ॥
बसोनीच ठायीं पहाती दुरी रे । मशीदींत राहोनि ध्यानस्थ हो रे ॥
असे दृष्टि भक्तांचिया रक्षणीं रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ७३ ॥
प्रभू रामचंद्रासि ते सेविती रे । तसे रामजन्मोत्सव मांडिती रे ॥
प्रभू कृष्णप्रेमासि ते चाहती रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ७४ ॥
मशीदींत अध्यात्म ते सांगती रे । तशा आरत्या, दिव्य कथा सदा रे ॥
कधीं दिव्य गूढांस निवेदिती रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ७५ ॥

## चमत्कार

चमत्कार साचार केले बहू रे । पणतींत पाणीच घालूनिया रे ॥
दिवे लागती ते वदा हो कसें रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ७६ ॥
उदी लावितां क्लेश जाती त्वरें रे । उदी लावितां कार्यसिद्धी घडे रे ॥
उदीतें खरी संतकृपा वसे रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ७७ ॥
मुखीं साइबाबा स्मरतां मुदें रे । सुखें साह्य होताति ते सर्वदा रे ॥
स्वभक्तांसि देताति ते दर्शना रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ७८ ॥
जई दृढ विश्वास हो अंतरीं रे । तई सत्य कल्याण होतें पहा रे ॥
जसा भाव, तैसा मिळे देवही रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ७९ ॥
स्वभक्तांकरीं ठेवितां चीलमी रे । दमा घालवीती जरी तो जुना रे ॥
दिली साक्ष प्रत्यक्ष धुरंधरा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ८० ॥
जयां माहिती अक्षरांची नसे रे । तयां सांगती संतसेवा करा रे ॥
लिहा संत माहात्म्य पोथी त्वरें रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ८१ ॥
कृपेनें कशी चालते लेखणी रे । विचारा तुम्ही दासगणूंस हें रे ॥
नसे वाचिलें लेखनीं ये कसें रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ८२ ॥
कसे दिव्य संस्कार होती कृपें रे । कसें लक्ष ते वेधिती हो पदीं रे ॥
कृपा व्हावया दृढ विश्वास बा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ८३ ॥
विचारा कसें श्रीगुरु त्र्यंबकां रे । कसें शिर्डिहूनी वसईस बा रे ॥
रुपायांत एकाच येणें घडे रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ८४ ॥
कडूलिंब वृक्षास पानें कडू रे । परी साइच्या बैसण्याच्या स्थळीं रे ॥
वदा हो कशीं येति पानें मधू रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ८५ ॥
पदीं भक्त नाना मुदें येति जैं रे । सदा साइ कल्याण तें चिंतिती रे ॥
उणें जें जया, देति तेंही मुदें रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ८६ ॥
पहा भक्त गोपाळ गुंडास बा रे । कुटुंबें गृहीं तीन होती जरी रे ॥
परी पुत्र त्यांतें नव्हे एकही रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ८७ ॥
जई साइच्या दर्शना येइ तो रे । तया बोलती पुत्र होई तुला रे ॥
तसें जाहलें गा पुढें सत्य बा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ८८ ॥
किती भक्त ऐसे पदीं येति बा रे । कुणातें प्रभू साइ हे बोधिती रे
कुणा सांगती गूढ ज्ञानार्थही रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ८९ ॥
कुणी साइतें नेति नवसासही रे । कुणी स्थावरादी गृहा वाहती रे ॥
कुणी नित्य सेवेंतही राहती रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ९० ॥
मशीदींत राहून ध्यानस्थ ते रे । तसे राम वा मारुती चिंतितीरी रे ॥
तसा जीर्ण उद्धार हो देउळा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ९१ ॥

# भक्तांस उपदेश

किती सुज्ञही थोर विद्वानही रे । प्रभू साईच्या नित्य सेवेंत बा रे ॥
मुदें राहुनी हीतही साधिती रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ९२ ॥
जईं प्राण देहांत या राहतो रे । तईं सत्य कल्याण साधा त्वरें रे ॥
अनित्यांत कां जीव हा ठेविता रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ९३ ॥
वपू आज आहे, न राही पुढें रे । नसे नित्य ती, शाश्वती ना मुळीं रे ॥
म्हणोनी वदा राम आजीच बा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ९४ ॥
जईं काळ हा बैसला खावया रे । तईं झोंप टाकूनि जागें रहा रे ॥
फुका काय आयुष्य हें वेंचितां रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ९५ ॥
नको संग्रहो हा अनित्याचिया रे । नको हे पसारे, पुढें जाति बा रे ॥
असारेच सारे, जसे होति वारे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ९६ ॥
दिसे दृष्टिला दृश्य जाणार बा रे । असे आज जें तें न राही उद्यां रे ॥
नसे शाश्वती कांहिं कोणाचिही रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ९७ ॥
परी नित्य जें एक आहे सदा रे । अनित्यांत जें नित्य शोधा त्वरें रे ॥
तुम्हांतें मिळे सत्य ठेवा पहा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ९८ ॥
महालादि सारी सुखसंपती रे । अजी दीसते जी टिकणार ना रे ॥
पहा काळ खाईल सर्वांस या रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ९९ ॥
न राहील कांहीं जनीं वैभवी रे । गृहादीक सारें लया जाति बा रे ॥
नका ठेवुं आसक्ति यांतें तुम्ही रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १०० ॥
अनासक्ति जैं मानसीं उद्भवे रे । तुम्हां सर्व हा लोक वाटे वृथा रे ॥
विरक्ती तईं ये मनीं आपुल्या रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १०१ ॥
न माझें तुझें कांहिं असे जगीं रे । नसे देह हा आपुलाही खरा रे ॥
असें भातुकें पंचतत्त्वांचिये रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १०२ ॥
पहा काळ हा पाठिशीं लागला रे । उभा राहि तो भक्ष्यही खावया रे ॥
कशी झोंप घेतां, त्वरें गा उठा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १०३ ॥
वदे कृष्णजी अर्जुनातें पहा रे । असे काळ मी नित्य खाई जना रे ॥
लयातें सदा लोक हा नेतसे रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १०४ ॥
तरी कर्म तें आपुलें गा करी रे । फलासक्ति सोडूनि तें आचरी रे ॥
नसे हातिं कांहींच तूझ्या पहा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १०५ ॥
न त्यागी वृथा कर्म तूं आपुलें रे । निमित्तासि म्यां तूज केलें उभें रे ॥
असे कर्मकर्ताच मी, अर्जुना रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १०६ ॥
अहंकार तो सोडि तूं आपुला रे । न बोले 'करीं मी स्वयें कार्य हें' रे ॥
त्यजीं मीपणा अर्पुनी तो मला रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १०७ ॥
सदा वृत्ति ते ठेवि सुशांतही रे । नको तामसी, राजसी ठेउं बा रे ॥

असो सत्य सात्वीक वृत्ती तुझी रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १०८ ॥
धनाचा नको, शक्तिचा डौल बा रे । वृथा गर्व नेईल नाशास तो रे ॥
नको मोह तो, कामही तो नको रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १०९ ॥
प्रभू चिंतनावीण रंगू नको रे । प्रभू एक तारील शेखीं तुला रे ॥
न तारी कुणी अन्य देवाविना रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ११० ॥
असो जागृती नित्य धर्मांचि ही रे । असो संग्रहीं धर्म, सत्कर्म तें रे ॥
तुजें काय येईल अंतीं सवें रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १११ ॥
जयें संसृती नित्य वाढेल ती रे । जयें आत्मज्योती प्रकाशे बहू रे ॥
जयें नीतिधर्मास आधार हो रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ११२ ॥
जयें शांति जीवास येई करी रे । जयें पूर्वजां शांति लाभेल बा रे ॥
जयें आर्यधर्मास शोभाच ये रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ११३ ॥
करी तें, करी तेंच सत्कार्य बा रे । नको वीसरूं आपुल्या तूं हिता रे ॥
प्रभू नित्य संनीध आहे तुझ्या रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ११४ ॥
दयाळू पहा देव आहे किती रे । करी पूर्ण तो काम भक्तांचिये रे ॥
तया आळवीतां क्षणीं धांव घे रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ११५ ॥
जई मातृगर्भांत प्राणी असे रे । तिथें पोसितो जीव हा श्रीहरी रे ॥
पुढें जन्म होतांहि तो रक्षितो रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ११६ ॥
स्तनीं दुग्ध मातेचिया निर्मितो रे । पुढें सत्य सांभाळ तोची करी रे ॥
प्रभू श्रीहरी पाळिता, पोसिता रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ११७ ॥
पुढें बुद्धि चातुर्य देताहि तो रे । तसें प्रेमहि ज्ञानही दे हरी रे ॥
करी सत्य सांभाळ तो सर्वदा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ११८ ॥

## आत्मबोध

असें कोण मी, कोठुनी ये जगीं रे । कुठें चाललों, कोण माता पिता रे ॥
कुणी निर्मिलें या जगा, प्रश्न हे रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ११९ ॥
मनीं प्रश्न हे थोर येती जई रे । तई श्रीगुरुच्या पदां दावितो रे ॥
प्रभू श्रीहरी तो जगद्वंद्य हो रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १२० ॥
जई अंतरीं येति या भावना रे । तई नित्य उत्कंठित चित्त हो रे ॥
कुणी प्रश्न हे सोडवी ईश्वरा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १२१ ॥
सदा ध्यास जीवीं जया हो असा रे । तया श्रीगुरुचे पद लाभती रे ॥
करी आत्मउद्धार प्राणी जवें रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १२२ ॥
असा बोध जीवांसि देती गुरु रे । जयें शांति ये अक्षयीं जीविता रे ॥
गुरू थोर आधार हो भाविकां रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १२३ ॥
किती जन्म फेरे जिवा जाहले रे । किती होति ते यापरीही पुढें रे ॥
किती मालिका ती असे ना कळे रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १२४ ॥

कधीं जीव हा मुक्त होईल बा रे । कुणी सोडवी गा मला यांतुनी रे ॥
असे कोण त्राता कळेना मला रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १२५ ॥

## संसारताप

प्रपंचांत मी व्यापलों गा बहू रे । नसे आदि अंतीं कुणी तारिता रे ॥
कुणी मार्ग तो उर्ध्व दावी मला रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १२६ ॥
नसे सौख्य कांहीं, सदा दुःख हो रे । किती आतसंबंध हे सूटले रे ॥
भवाब्धींत त्राता, प्रभो, कोण हो रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १२७ ॥
कुणी दुःख वारील माझें, प्रभो रे । कुणी हात देई, भवीं मी बुडें रे ॥
कुणी संकटीं सत्य धांवून ये रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १२८ ॥
दिसे सत्य संसार असारही रे । सदा त्रस्त जीवीं असें राहिलों रे ॥
कुणी सोडवी, तारि मातें, प्रभो रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १२९ ॥
जगीं पाहतां स्वार्थसाधू बहू रे । परार्थी कुणी ना झटे, श्रीहरी रे ॥
असे अर्थ पाशीं, तईं येति सारे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १३० ॥
पहा आतइष्टादि बंधू कसे रे । पहा सोयरीं मित्रबंधू कसे रे ॥
जिथें स्वार्थ भासे, तिथें मीळती रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १३१ ॥
पसाराच सारा जगीं चालला रे । कधीं श्रीहरी सोडवी यांतुनी रे ॥
प्रभो धांव रे, धांव या संकटीं रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १३२ ॥
पहा सोयरे सर्व देहाचिये रे । कुणी आत्मसंबंध तो ठेविला रे ।
गुरो, सद्‌गुरो, श्रीगुरो एक तूं रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १३३ ॥

## सद्‌गुरु–प्रभाव

ध्रुवातें कुणीं मार्ग तो दाविला रे । तपस्या वनीं मांडिली हो जयें रे ॥
गुरू सद्‌गुरू नारदू थोर तो रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १३४ ॥
कुणीं बाळ प्रल्हाद तो तारिला रे । सदा जो स्मरे साच नारायणा रे ॥
नसे अन्य श्रीसद्‌गुरूवीण बा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १३५ ॥
किती पातकी पाहि वाल्या असे रे । कुणीं मंत्र त्या दीधला सत्कृपें रे ॥
कृपावंत तो सद्‌गुरू नारदू रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १३६ ॥
कुणीं तारिलें भाविकांतें जनीं रे । कुणी पामरातें करीं घेतलें रे ॥
कुणीं बैसवी सत्पदातें जिवा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १३७ ॥
कुणीं आत्मउद्धार केला वदा रे । कुणीं या जिवातें शिवा भेटवी रे ॥
कुणी दावि सन्मार्ग तो सद्‌गुरू रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १३८ ॥
कुणी दिव्य ज्योती हृदीं लावि बा रे । कुणी आत्मतत्त्वा वद उजळी रे ॥
कुणी दिव्य आत्मा करी? सद्‌गुरू रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १३९ ॥